किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICS ... LIBRARY 11/6/07

३ ● पुनर्शोध
५ ● साम्यवादात धर्माचा चंचुप्रवेश ?
११ ● विज्ञानातील महासत्तेच्या दिशेने चीन ?
१६ ● वितळते 'परमाफ्रॉस्ट' आणि भडकते वणवे
२० ● चतु:सूत्री 'सेझ'च्या आकर्षणाची
२७ ● जातिसमूहांची राज्यनिहाय स्थिती
३७ ● जिकडे-तिकडे
● 'थिंक ग्लोबल ॲक्ट लोकल'
● काम कमी, दाम कमी.....

खंड ६ : अंक ३ जून २००७

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**<u>'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.</u>**

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ६ (अंक ३) जून २००७**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

***'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?***

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

***'अर्थबोधपत्रिके'चा हेतू***

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

***'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# पुनर्शोध

विरोधाभास हे आजच्या आधुनिक जगाचे जणू अंगभूत वैशिष्ट्यच बनले आहे. जीवनाच्या कितीतरी प्रांतांत हा विरोधाभास दृग्गोचर होतो. आजवर जपलेल्या मूल्यव्यवस्थेला एकीकडे तडे जाताना दिसतात, तर दुसरीकडे कालोचित मूल्यव्यवस्थेच्या स्थापनेसाठीचे प्रयत्नही साकारत आहेत. नवीन मूल्ये स्वीकारण्याचा आग्रह धरला जात असताना जुनीच मूल्ये उराशी कवटाळण्याचा अट्टहासही दिसतो. नवी व जुनी मूल्ये परस्परांच्या साथीने वाटचाल करतानाही काही ठिकाणी आढळतात. कुठे मूल्यांवरून संघर्ष होतो आहे, तर कुठे मूल्यांमुळे मैत्रीचे धागे जुळले जात असल्याचे अनुभवास येते. तसे पाहिले तर हा सारा विरोधाभास एका परीने अपरिहार्यही आहे. कारण, उभे जगच आज संक्रमणाच्या सावलीतून प्रवास करते आहे. अवघे मानवी तसेच नैसर्गिक पर्यावरणच पालटत असताना नव्याजुन्याचा हा लपंडाव स्वाभाविकच ठरतो. पालटलेल्या वर्तमानात प्रवेशताना प्रत्येकाच्याच खांद्यावर भूतकाळाचे गाठोडे असतेच. वाटचालीदरम्यान त्यातील नेमका कोणता ऐवज पुढील प्रवासातील पाथेय म्हणून कितपत उपयोगी ठरू शकेल, याबाबतचा नीरक्षीरविवेक हा प्रत्येकच पांथस्ताला बाळगावा लागतो. त्यासाठी गाठोडे उपसून त्यातील संचिताचे नव्याने शोधन वारंवार हाती घ्यावे लागते. परंपरेचा हा असा पुनर्शोध घेत असताना तिच्यातील बहुतेक साऱ्याच बाबींचे मूल्यांकन नव्याने करण्याची शिस्त अंगी बाणवणे, हे खरे आव्हान ठरते. हे आव्हान मोठे बिकट आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या झंझावातात आपला धर्म, संस्कृती, परंपरा, राष्ट्र-राज्य-प्रांत-भाषा-वंश-वर्ण यांसारख्या टेकूंच्या आधारे टिकून राहण्यासाठी धडपडणारी आपली 'आयडेन्टिटी' या सगळ्याच बाबींचा पुनर्शोध घेऊन त्यांचे पुनर्मूल्यांकन करण्याची निकड ठायीठायी प्रकर्षाने जागते आहे. वैश्विक समुदायाचा एक घटक बनण्याची अनिवार्यता - इच्छा असो अथवा नसो - सगळ्याच देशांमधील मानवी समूहांना घेरते आहे. वैश्विक रचनेच्या साखळीत बिनबोभाट गुंफले जाण्यासाठी आपल्या ठायीचे सारेच कंगोरे बोथट बनवावे लागतील. हे कंगोरेच छाटले गेले तर आमची 'आयडेन्टिटी' पार लोपून जाईल

का....ही भीती पोटात उरतेच. म्हणजे, समष्टीचा हिस्सा तर बनायचे परंतु त्याच वेळी आपले पृथक अस्तित्वही टिकवून धरावयाचे, अशी ही तारेवरची कसरत आहे. ही कसरतही साधीसुधी नाही. या द्वंद्वाला अस्तर आहे ते जीवघेण्या स्पर्धेचे. जागतिक व्यवस्थेचा केवळ एक घटक असून आपले भागणार नाही तर, या व्यवस्थेत आपण आघाडीवर राहिले पाहिजे ही आज प्रत्येकच देशाची गरज बनली आहे. बिनीवर राहण्यासाठीच जीवाचा आटापिटा. त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजण्याची मानसिकता. ही शर्यत जिंकण्यासाठी कोणत्याही साधनाची मदत घेण्याची तयारी - मग ते आजच्या २१ व्या शतकातील अत्याधुनिक तंत्रज्ञान असो वा पार मध्ययुगात सद्दी गाजवलेला धर्म असो. चीनसारख्या कमालीच्या कट्टर साम्यवादी देशाच्या राजकीय जीवन तसेच विचारप्रणालीतून एकेकाळी हद्दपार करण्यात आलेला धर्म आता राजकीय पटलावर चंचुप्रवेश करू लागला आहे, या विरोधाभासाचे म्हणूनच नवल वाटले तरी आश्चर्य वाटत नाही. स्थानिक पातळीवरील का होईना, पण, अर्थकारणाला धर्माचरणामुळे गती प्राप्त होत असेल तर स्थानिकांच्या धर्मनिष्ठांना तेवढ्यापुरता वाव देण्याची लवचिकता, लोकांच्या धार्मिक व्यवहारांकडे काणाडोळा करण्याची मानसिकता साम्यवादी चीनच्या पोलादी चौकटीत अलीकडे रुजू लागलेली दिसते. धर्मभावनेचे उपयोजन, जागरण केल्याने समाजात शांतता व सहजीवन नांदण्याबरोबरच सार्वजनिक उपक्रमांसाठी वित्तीय साधनसामग्रीही उभी राहण्यास हातभार लागत असेल तर धर्माला आडकाठी का करा, असा व्यावहारिक विचार चिनी धोरणकर्ते करू लागले असतील तर 'धर्म' या संकल्पनेच्या पुनर्शोधाचाच तो एका अर्थाने परिपाक ठरतो. जी बाब धर्माची तीच बाब विकासविषयक धारणांची, विकासासाठी अंगिकारलेल्या धोरणांची. मग ते धोरण आर्थिक विकासासाठी प्रगत परकीय तंत्रज्ञान आयात करून त्याची नक्कल करण्यासंदर्भातील असो वा एकेकाळी चीन तसेच तैवानने वेगवान आर्थिक विकासासाठी राबविलेल्या 'सेझ'प्रणित 'मॉडेल'च्या अनुकरणाचे असो. नानाविध संकल्पनांच्या पुनर्शोधाचे पर्व जगभरात ठायीठायी समूर्त होताना दिसते आहे. त्याच पुनर्शोधपर्वाच्या काही पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. ✿✿

# साम्यवादात धर्माचा चंचुप्रवेश ?

माणसाच्या दैनंदिन जीवनात धर्माचे स्थान किती, हा प्रश्न वादाचा असला तरी बहुतांश माणसांनी धर्माचे बोट सोडलेले दिसत नाही, हे वास्तव नजरेआड न करता येणारे आहे. धर्म उपयोगी असो वा नसो, त्याचा विचार करणे अभ्यासकांना, राजकीय नेत्यांना भाग पडले आहे. ही स्थिती आज जगभरात सर्वत्र आढळते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. अमेरिका, युरोप, चीन, जपान, भारत, पाकिस्तान, मलेशिया, अरब देश इत्यादी अनेकानेक देशांमध्ये धर्म ही बाब महत्त्वाची ठरताना दिसते. त्यांतही चीनमधील घडामोडी तुलनेने अधिक महत्त्वाच्या ठरतात. कारण, गेली अनेक दशके चीनने साम्यवाद स्वीकारला आहे. त्यामुळे चीनच्या राजकीय जीवनात धर्माचे स्थान कधीच प्रबळ नव्हते. पण, चिनी नागरिकांच्या वैयक्तिक जीवनात धर्मतत्त्वे -म्हणजे तेथे मान्य असलेली नीतीतत्त्वे - डोकावत होतीच. कारण, पाश्चात्यांच्या धर्म संकल्पनेला न मानणाऱ्या चिनी समाजाचा पाया नीतीशास्त्राचा आहे. तो त्यांच्या दैनंदिन व्यवहाराचा /आचारांचा भाग आहे. अलीकडे मात्र, चीनमधील राजकीय वर्तुळात धर्मविषयक चर्चा स्थान मिळवू पाहात आहे. साम्यवादी धोरणात धर्म डोकावू लागला आहे. साम्यवादाच्या दृष्टीने धर्म ही 'अफूची गोळी' मानली गेली असली तरी ही गोळी फायद्याची ठरू शकते का, असा विचार चीनमधील नेते करू लागले आहेत. राजकीय पटलावर भुवया उंचवायला लावणारी ही घटना आहे, असे म्हटले जात आहे.

चिनी सरकार असा विचार करू लागले आहे. कारण, चीनमध्ये अलीकडच्या आर्थिक सुधारणांच्या कालखंडात आर्थिक विषमता व काही प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. अशा सामाजिक अस्वस्थतेमुळे युवकांमध्ये काही प्रमाणात नैराश्याची भावना वाढीस लागली आहे. तसेच जागतिकीकरणामुळे इतर देशांमधील नागरिकांशी संपर्क येऊन चिनी नागरिकांची विचारधाराही बदलू लागली आहे. त्यातच, अलीकडे, चीनच्या नेतृत्वाने 'सुसंवादी समाजा'चे (हार्मोनिअस् सोसायटी) उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवले आहे. वरील घडामोडी लक्षात घेता या उद्दिष्टपूर्तीसाठी धर्माची मदत घेणे गैर मानू नये, असा विचार तेथे पुढे येत आहे.

"ड्रॅगनचं 'स्पिरिट' जागवा, ड्रॅगनची संस्कृती स्थापन करा," असे आवाहन अलीकडे चीनमधील ग्रामीण भागात करण्यात येत आहे. संपूर्ण जगासाठी 'ड्रॅगन'

म्हणजे 'चीन' असे समीकरण झाले आहे. मात्र, होंगलीउतान या भागात, ड्रॅगन म्हणजे 'ब्लॅक ड्रॅगन' हा देव मानला जातो. मानवी रूपातील त्याचे एक मंदिर येथे प्रसिद्ध आहे, त्याबाबतची चर्चा येथे चालू आहे. १९६०च्या दशकात सांस्कृतिक क्रांतीच्या काळात माओवाद्यांनी हे सुमारे ५०० वर्षे जुने असलेले मंदिर नष्ट केले होते. तर आज, सरकारी अधिकाऱ्यांची कृपादृष्टी या मंदिरावर झाली आहे. मात्र, 'कृपादृष्टी झाली' म्हणजे नेमके काय घडले, हे मात्र स्पष्ट होत नाही. या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची घटना, ग्रामीण भागात धर्मविषयक बाबींचा प्रभाव वाढत असल्याची सूचक मानली जाते. यामुळे ग्रामीण भागातील सामाजिक व राजकीय चित्रात काही प्रमाणात बदल होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तसेच, साम्यवादी पक्षाचा प्रभाव अधिक असलेल्या शहरी भागांतही धर्माबद्दलचे आकर्षण वाढीस लागले आहे. चीनमध्ये बौद्धधर्म, ताओइझम यांबरोबरच पूर्वजांची पूजा आणि अशा इतर काही परंपरांनाही पुन्हा महत्त्व मिळू लागले आहे. याचबरोबर तेथे इस्लाम व ख्रिश्चन धर्मही वाढू लागला आहे. या सर्व घडामोडींकडे चीनच्या सरकारचे बारीक लक्ष असून धर्माप्रतीच्या सरकारच्या भूमिकेचा फेरविचार तेथे होऊ लागला आहे. किंबहुना, एकंदरीतच सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत धर्माचा वापर कसकसा करता येईल, या दिशेनेही विचार करण्यात यावा, असे तेथे म्हटले जाते.

या पार्श्वभूमीवर होंगलीउतान या भागातील 'ब्लॅक ड्रॅगन' मंदिराचा जीर्णोद्धार करण्यामागची कहाणी बोलकी आहे. या डोंगराळ भागातील सामाजिक उपक्रमांना, विशेषत: शाळेला, 'ब्लॅक ड्रॅगन' या मंदिराकडून अर्थसाहाय्य करण्यात येत आहे. ही आर्थिक मदत महत्त्वाची ठरते कारण ग्रामीण भागातील स्थानिक प्रशासनाची आर्थिक स्थिती बिकट आहे. त्यातच शेतकऱ्यांना खूष करण्यासाठी चिनी सरकारने त्यांच्याकडून घेण्यात येणारे कर रद्द केल्याने प्रशासनाच्या आर्थिक उत्पन्नाचे साधन हिरावले गेले. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाच्या विकासासाठी जो कोणी मदत करेल ती मदत - मग ते 'ब्लॅक ड्रॅगन' मंदिर का असेना - प्रशासनाला हवी आहे. हे एक उदाहरण झाले. असे चित्र इतर भागांतही असण्याची शक्यता अधिक आहे. पण, 'ब्लॅक ड्रॅगन' ची कथा एवढ्यावरच संपत नाही. होंगलीउतान या भागाची जबाबदारी साम्यवादी पक्षातर्फे झांग या तरूण व्यक्तीवर सोपविण्यात आली आहे आणि त्या भागातील नागरिकांनी ज्येष्ठ नागरिक वांग केहुआ यांना आपला प्रतिनिधी म्हणून निवडून दिले आहे. प्रशासकीय रचनेचा विचार करता झांग यांचे पद वरचे आहे व वांग यांचे पद खालचे

आहे. पण, तरुणांपेक्षा ज्येष्ठांना महत्त्व देण्याची मानसिकता तेथे आहे. तसेच वांग यांच्या हाती 'ब्लॅक ड्रॅगन' मंदिराचे नियंत्रण (आणि पैसाही) आहे. त्यामुळे पक्षनियुक्त अधिकाऱ्यापेक्षा लोकप्रतिनिधी असणारे वांग केहुआ यांच्याच शब्दाला तेथे वजन प्राप्त झाले आहे. या मंदिराचे पुनर्निर्माण करण्याची मूळ कल्पना वांग यांचीच होती. त्यांनी यासाठी स्वतःचा काही निधी दिला आणि गावाकडूनही निधी जमविला. मंदिराचे पुनर्निर्माण करण्यामागे धार्मिक कारणही आहे. ते म्हणजे, ड्रॅगन पाऊस आणतो, असा समज तेथे प्रचलित आहे. जर हे मंदिर उभारले तर आसपासच्या गावांमधीलही नागरिक तेथे येतील, प्रार्थना करतील व पाऊसपाणी चांगले होऊन शेतीला मदत होईल, अशी धारणा स्थानिकांमध्ये आहे. याचबरोबर, त्यामागे छुपे आर्थिक कारणही आहे, असे म्हटले जाते. नागरिकांची प्रार्थना देवाने ऐकली तर मंदिराला देणग्या मिळतील आणि आर्थिक स्थिती सुधारली जाईल व त्यायोगे शाळा व तत्सम उपक्रमांसाठी अधिक निधी उपलब्ध होईल, असा हिशेब आहे. पण वांग मात्र हे आर्थिक कारण पुढे आणत नाहीत. उलट, ज्या व्यक्तींनी मंदिराचा नाश केला त्यांचे कसकसे नुकसान झाले हे ते लोकांना सांगतात. या मंदिराला पुजारी नाही, पण हा 'ब्लॅक ड्रॅगन' मात्र भविष्य सांगतो, कौल देतो अशी श्रद्धा आहे. ड्रॅगनचा संदेश चेननामक ज्येष्ठ व्यक्तीजवळ असलेल्या काही जुन्या कवितांमधून सांगण्यात येतो.

खरे तर, चिनी सरकारच्या धोरणांमध्ये अशा प्रकारच्या अंधश्रद्धांना थारा नाही. किंबहुना, हे प्रकार अवैध मानले जातात. पण सरकार व प्रशासन अशा गोष्टींकडे आता काणाडोळा करत आहे. सरकारी नियम सैलसर करण्यात येत आहेत. युलिन भागात सुमारे १०६ श्रद्धास्थाने आहेत. त्यातील काहींची सरकारदप्तरी रीतसर नोंदणीही झालेली आहे. त्यांतील बहुतेक श्रद्धास्थाने बौद्ध, ताओइझम, इस्लाम धर्मनिष्ठांशी आणि प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक या ख्रिस्ती धर्मातील पंथांशी संबंधित आहेत. अलीकडे ताओइझमशी संबंधित काही श्रद्धास्थाने 'ब्लॅक ड्रॅगन'शी जोडण्याचा प्रयत्न होतो आहे. म्हणजे एका अर्थाने, सरकार या प्रकाराला मान्यता देत आहे, असे दिसते. यांमुळे गावाच्या विकासास थोडाफार जरी हातभार लागला तरी ते सर्वांच्याच पथ्यावर पडते आहे. शिवाय, नागरिकांच्या विरोधात धोरणे राबविण्यास सरकारी अधिकारीही नाखूष असतात. त्यांच्या अखत्यारीतील प्रदेशांत निषेध, मोर्चे इत्यादी प्रकार झाल्यास त्यांचे करिअर अडचणीत येऊ शकते. त्यापेक्षा 'ब्लॅक ड्रॅगन'सारखे प्रकार चालवून घेणे हे त्यांना सोयीचे ठरते. याशिवाय मंदिराच्या प्रशासकीय रक्षणकर्त्यांचा 'आर्थिक

फायदा' होतो तो वेगळाच. काही स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते व्यापारी कंपन्या जशा अर्थउद्योगात मदत करतात तशीच ही मंदिरे मदत करतात. त्यांच्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला गती येते. विशेषत:, 'ब्लॅक ड्रॅगन' सारखी मंदिरे जत्रा आयोजित करतात तेव्हा ग्रामीण भाग गजबजून जातो.

चीनच्या ग्रामीण भागातील चित्र हे थोड्याफार फरकाने असेच आहे. मंदिरांचा जीर्णोद्धार, श्रद्धास्थानांची स्वच्छता, चर्च व मशिदींचे नूतनीकरण अशा घटना घडत असल्या तरी याचा अर्थ चीनने नागरिकांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिले असा मात्र नाही. त्यातही चीनच्या पश्चिमेकडील झिन्जियांग प्रांतात इस्लाम धर्म मानणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने तिथे सरकारची पकड घट्ट आहे. तथापि हे नागरिक कट्टरपंथीय नाहीत. ते 'सेक्युलर' गटाच्या जवळ जातात. त्यांना 'वीगर' म्हटले जाते. १९४९ पूर्वी हा भाग पूर्व तुर्कस्तान म्हणून ओळखला जात होता. तो चीनने आपल्या अधिपत्याखाली आणल्यानंतर तेथे स्वायत्त मंडळ स्थापन करण्यात आले आहे. तरी तेथील नैसर्गिक संसाधनांवर व धार्मिक स्वातंत्र्यावर चिनी सरकारचे नियंत्रण आहे. तसेच तिबेटमधील बौद्ध धर्मियांसंदर्भातही चीनने कडक भूमिका घेतली आहे. ख्रिस्ती धर्माचे पालन करणाऱ्यांवरही सरकार बारीक नजर ठेवून आहे. १९९०च्या दशकात तेथे 'फालून गोंग' सारख्या पंथाचा विस्तार झाला. त्यांच्या संदर्भातही सरकार कडक भूमिका घेत आहे.

चीनमधील नागरिक आपली धार्मिकता उघडच करत नाहीत. त्यामुळे यासंदर्भात चीनमध्ये नेमकी अशी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. तरीही चिनी सरकारच्या श्वेतपत्रिकेनुसार तेथे सुमारे १० कोटी नागरिक धार्मिक आहेत पण, प्रत्यक्षात ही संख्या कितीतरी अधिक आहे, असे म्हटले जाते. असे असले तरी धर्माबाबत वेगळी भूमिका घ्यावी किंवा कसे याबाबतची चर्चा चिनी नेत्यांमध्ये चालू आहे. म्हणजे, याचा अर्थ, तेथील सरकारच्या मते ज्या सरकारविरोधी कारवाया मानल्या जातात, त्यांच्याप्रती उदार दृष्टिकोण अवलंबिणे असा नव्हे. तर, चिनी नागरिकांच्या मनांत (चिनी नागरिक हे हॅनवंशीय आहेत) पूर्वापार रुजलेल्या (म्हणजे हॅनवंशियांच्या) श्रद्धांप्रती पाठिंबा व्यक्त करणे होय. अलीकडे, तेथील नेत्यांना असेही जाणवू लागले आहे की, बदलत्या काळात केवळ पक्षाचीच विचारधारा तेथील सर्वसामान्य नागरिकांना बांधून ठेवू शकत नाही. नागरिक आता वेगवेगळ्या विचारधारांकडे आकर्षित होत आहेत. त्यामुळे त्यांच्या भावना दुखावण्यापेक्षा व त्यांवर टीका करण्यापेक्षा त्यांच्या भावनांना पाठिंबा दिला तर त्याचा फायदा सरकारला होऊ शकतो.

चीनमधील सध्याची सामाजिक स्थिती पाहता तेथे सामाजिक शांततेचा, स्थैर्याचा मुद्दा महत्त्वाचा ठरत असून त्यासाठी सरकारला अशी काही पावले उचलणे भाग पडेल, असे मत सरकारमधील नेतेच मांडत आहेत. आर्थिक सुधारणा राबवण्यात सहभागी असलेले एक अधिकारी पॅन यू यांच्या मते, मार्क्सने जेव्हा धर्माला 'अफूची गोळी' असे संबोधले तेव्हा धर्म हा वाईटच आहे, हेच त्याला सुचवायचे होते, असेही नाही. पॅन असे स्पष्ट करतात की भांडवलशाही देशांत धर्म आणि भांडवलशाही या दोन्हींचे सहअस्तित्व असते, त्याप्रमाणेच समाजवादी समाजांमध्येही धर्म असू शकतो, चीनच्या इतिहासावरूनही असे दिसते की, सामाजिक स्थैर्य राखण्यात बौद्ध धर्माचे व ताओइझमचे सहकार्य होते. २००१मध्ये मांडलेल्या या मतावरून पॅन यांचा संदेश पुरेसा स्पष्ट होतो. त्यांच्या विचारांनी साम्यवादी पक्षाच्या नेत्यांमध्ये तेव्हा खळबळ माजली होती. समाजवादाच्या प्रभावात धर्माचे प्रयोजन राहणार नाही, धर्म मृतवत् होईल, असे तेथे मानले जात होते. ही पक्षाची भूमिका होती. पण आता, धर्माबाबत पक्षच काही वेगळी धोरणे राबवत आहे.

गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात चीनने जगभरातील बौद्धधर्मिय नेत्यांची बैठक आयोजित केली होती (तिबेटचे धार्मिक नेते दलाई लामा यांना मात्र या बैठकीचे निमंत्रण नव्हते, हा भाग वेगळा !). या घटनेला सरकारी प्रसिद्धिमाध्यमांमधूनही बरीच प्रसिद्धी देण्यात आली. चीनचे नेते सध्या 'सुसंवादी समाज' (हार्मोनिअस् सोसायटी - चिनी भाषेत हेक्झि शेहुई) या संकल्पनेचा उद्‌घोष करीत आहेत. त्यामुळे अशा सुसंवादी समाजाकडे जाण्याची सुरुवात मनामनांतूनच होते, अशी या बैठकीची मध्यवर्ती कल्पना होती. पॅन यांच्या विचारांची दिशा अशीच होती. यानंतर गेल्या ऑक्टोबरमध्ये अशा समाजाकडे जाण्याची वाटचाल कशी होऊ शकते, त्याबाबत सरकारने एक निवेदनही जारी केले आहे. अशा समाजाकडे जाण्यासाठी धर्म सकारात्मक भूमिका बजावू शकतो, असे त्यात म्हणण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, चीनमधील संस्कृतीत रुजलेल्या 'कन्फ्युशियानिझम'चे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून की काय पण चीनने गेल्या दोन-तीन वर्षांत जगभरात डझनावारी 'कन्फ्युशियस इन्स्टिट्यूट्स्' स्थापन केल्या आहेत (पाहा - चीनची सॉफ्ट पॉवर, अर्थबोधपत्रिका, नोव्हेंबर २००६).

दरम्यान, चीनच्या ग्रामीण भागात 'पूर्वजांचे स्मरण' या प्रथेने पुन्हा जोर धरला असून तेथील राजकारणात व समाजकारणात तिचा प्रभाव वाढू लागला आहे. या

प्रथेमुळे वंशाला महत्त्व प्राप्त होते. वंशात ज्येष्ठता मिळवलेली व्यक्ती समाजजीवनात पुढे येते. परिणामी, गावपातळीवरील भांडणतंटे सोडविताना सरकारी अधिकाऱ्यांपेक्षा गावपातळीवरील ज्येष्ठांना अधिक महत्त्व मिळू लागले आहे. मात्र या जुन्या परंपरांमध्ये स्त्रियांचे स्थान दुय्यम समजले जात असल्याने स्त्रीवादी गट नाराज होऊ लागला आहे. त्यामुळे या प्रथेच्या विरोधात काही ठिकाणी ख्रिस्ती धर्माचा प्रसार होऊ लागला आहे, असे दिसते. अशा ठिकाणी घरगुती चर्चच्या माध्यमातून नागरिक एकत्र येत आहेत. चिनी सरकारने यावर बंधने घातली नसली तरी त्यावर त्यांची नजर आहे.

चीनमधील धर्मप्रसाराचे आणखी एक कारण म्हणजे तेथील ढासळलेली आरोग्यसेवा. सरकारी रुग्णालयांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. औषधांच्या किंमती वाढवून रुग्णांकडून पैसे वसूल केले जात आहेत. या परिस्थितीचा फायदा घेऊन 'फालून गोंग'ने तर 'औषधोपचाराविना रुग्णांना बरे करू', असे म्हणून आपले विचार पसरविले होते. ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांनी सरकारी रुग्णांलयांपेक्षा कितीतरी कमी खर्चात रुग्णांवर उपचार करण्यासाठी दवाखाने चालू केले. अशा दवाखान्यांमध्ये येशू ख्रिस्ताच्या तसबिरी झळकत असतात. काही ठिकाणी तर धार्मिक संस्थांनी सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, यासाठी सरकारी अधिकारी उत्तेजन देत असतात, असे आढळते. हाँगकाँग येथील धार्मिक संस्थांनी शाळा व रुग्णालये कशी चालवली आहेत, ते पाहून या, असे हे अधिकारी सांगतात. चीनमधील या घडामोडी पाहून परदेशांतील ख्रिस्ती धर्मगुरूंनी, 'नागरी समाजांना धर्माची आवश्यकता आहे', असे आता चीनला पटत असल्याची टिप्पणी केली आहे.

चिनी सरकारच्या भूमिकेत असा थोडासा बदल झाल्याने गेल्या पाच वर्षांत चीनने तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांच्या प्रतिनिधींबरोबरही चर्चा केली आहे. दरम्यान, धर्मप्रसाराच्या या घटनांपासून साम्यवादी पक्षही ठणठणीत कोरडा राहिला आहे, असे नाही. पक्षाशी संबंधित असलेल्या अनेक व्यक्ती धर्मनिष्ठा जोपासू लागल्या आहेत. याची नोंद पक्षाने घेतली असली तरी त्याबाबत कारवाई केलेली नाही. या धर्मप्रसाराला सरकार कठोर विरोध करीत नाही, याचे आणखी एक कारण म्हणजे, सामाजिक अस्वस्थता व आर्थिक विषमता वाढण्याच्या काळात तेथील युवकांमध्ये निराशेची भावना वाढीस लागली असून ती घालविण्यासाठी धर्माची मदत झाली ते सर्वांच्याच हिताचे ठरणार आहे. या घडामोडी पाहता साम्यवादात आता धर्माचा चंचुप्रवेश होऊ लागला आहे, असे म्हणता येईल ?

# विज्ञानातील महासत्तेच्या दिशेने चीन ?

चीनमधील एकेका कालखंडाचे वर्णन करणाऱ्या वेगवेगळ्या घोषणा आणि संकल्पना यांना तेथील इतिहासात स्थान मिळाले आहे. माओंच्या काळात 'लोकांची सेवा करा', डेंग झिआओपिंग यांच्या काळत 'सुधारणा व खुलेपणा' आणि 'आधुनिकी -करणाची चतु:सूत्री' या घोषणांना स्थान मिळाले. तर, जियांग झेमिन आणि हू जिंताओ यांच्या काळात अनुक्रमे 'तिघांचे प्रतिनिधित्व' (द थ्री रिप्रेझेन्ट्स) आणि 'शांततापूर्ण मार्गाने उदय' व 'सुसंवादी समाज' या घोषणा महत्त्वाच्या ठरल्या. आता तेथे 'स्वतंत्र नवशोधन' (इंडिपेन्डन्ट इनोव्हेशन) या घोषणेचा काळ चालू झाला आहे. 'स्वतंत्र नवशोधन' या संकल्पनेत नवीन तंत्रज्ञान, नवीन उत्पादने व उत्पादनप्रक्रिया तसेच उत्पादनात वेगळ्या प्रकारच्या कच्च्या मालाचा वापर अशा तीनही बाबींचा समावेश होतो. जागतिक अर्थव्यवस्थेत चीनला स्थान मिळवायचे असेल तर विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरणे अनिवार्य आहे, असे तेथील धोरणकर्त्यांना जाणवले आहे. तसेच यासाठी अमेरिका व युरोप येथील तंत्रज्ञानाची नक्कल करून भागणार नाही; तर, चीनला नवशोधनाची कास धरावी लागणार आहे, हा विचार तेथे बळकट होऊ लागला आहे. म्हणूनच 'स्वतंत्र नवशोधना'ला (चिनी भाषेत - 'झिझू चुआंगक्झिन') चालना देण्याची योजना आखण्यात आली आहे. चीनचे अध्यक्ष हू जिंताओ यांनी गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यात काँग्रेससमोर केलेल्या भाषणात 'नवशोधनाच्या दिशेने जाणारा समाज' उभा करण्याचे आवाहन केले होते. पेटंट मिळवण्यात तसेच वैज्ञानिक 'सायटेशन्स'मध्ये जगातील पहिल्या पाच देशांमध्ये चीनचा क्रमांक असावा, हे चीनपुढील ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चिनी सरकारच्या या भूमिकेची पार्श्वभूमी आहे ती अलीकडच्या काळातील प्रगतीची. गेले दशकभर चीनच्या आर्थिक वाढीचा वेग सरासरी ९ टक्के इतका राहिला आहे. त्यासाठी कमी खर्चिक उत्पादनप्रक्रिया, आयात केलेले तंत्रज्ञान आणि परकीय गुंतवणूक या तीन बाबी कारणभूत ठरल्या. चीनच्या उत्पादनप्रक्रियेत परदेशांमधील वस्तूंची नक्कल करण्याचा भाग अधिक होता. त्यामुळे 'कॉपीबहादर' अशीही चीनची

ओळख झाली. तरी हे 'चिनी प्रतिमान' इतके यशस्वी झाले की जागतिक बाजारपेठेचा विचार करता, फोटोकॉपी करणारी यंत्रे, डीव्हीडी प्लेअर्स आणि धुलाई यंत्रे यांच्या उत्पादनात चीनने बरीच आघाडी घेतली. बाजारपेठीय अर्थव्यवस्थेत, उत्पादनात आघाडी मिळवणे महत्त्वाचे असले तरी यापुढील काळात केवळ तेवढेच पुरेसे ठरणार नाही. ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या या युगात नवशोधनाला महत्त्व असून त्या दिशेने जाण्याचे प्रयत्न करणारे देशच जागतिक अर्थ व राजकारणात आघाडीवर राहतील, हे चिनी नेत्यांनी ओळखले आहे. म्हणूनच ही घोषणा करण्यात आली आहे.

चीनने अतिशय विचारपूर्वक नवी योजना आखली आहे. योजनेतील प्रस्तावांबाबत दोन हजार शास्त्रज्ञांनी तीन वर्षे चर्चा केली. त्यानंतर त्यांच्या सूचना पंतप्रधान वेन जिआबाओ यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे पाठवण्यात आल्या. चीनमधील संशोधनसंस्थांच्या सहकार्याने आखलेल्या योजनांची अंमलबजावणी करून १९५०च्या दशकात चीनने अणुबाँब व उपग्रहनिर्मितीत यश मिळवले तशाच धर्तीवर ही नवी योजना आखण्यात आली आहे. मध्यम व दीर्घकालीन उद्दिष्टे असलेल्या या योजनेत खालील बाबींचा समावेश होतो.

- चीनच्या अर्थव्यवस्थेला आणि विकासाला साहाय्यभूत ठरणारी ११ क्षेत्रे निवडून त्यातील सुमारे ६८ उद्दिष्टांचा प्राधान्यक्रम लावण्यात आला आहे. यात ऊर्जा, पर्यावरण, कृषी, उत्पादन, वाहतूक, आरोग्य इत्यादी क्षेत्रांचा समावेश आहे.
- 'कोअर' इलेक्ट्रॉनिक उपकरणे, मोठ्या प्रमाणावरील एकात्म असलेल्या उत्पादनप्रक्रिया, वायरलेस दूरसंचार यंत्रणा, जैवतंत्रज्ञान, एड्स् व कावीळ, मोठ्या विमानांची निर्मिती, अशा काही क्षेत्रांमध्ये विशेष संशोधन प्रकल्प चालू करण्याचे ठरवण्यात आले आहे.
- चालू शतकातील महत्त्वाच्या तंत्रज्ञानात गणना झालेल्या जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अत्याधुनिक उत्पादन क्षेत्र, लेझर व अवकाश संशोधन इत्यादी क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करणे.
- चालू शतकातील महत्त्वाचे व आव्हानाचे ठरलेले विज्ञान म्हणून गणल्या गेलेल्या मानवी मेंदूसंशोधन, भौतिकशास्त्र, गणित आणि भूविज्ञान यांबाबत अभ्यास.
- नॅनोटेक्नॉलॉजी, प्रथिनविषयक संशोधनाला चालना देणे.

या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आखण्यात आलेली नवीन उपाययोजना अशी -

- संशोधन व विकास यांवरील खर्चात वाढ करणे. २००४मध्ये ठोकळ देशी उत्पादनाच्या (जीडीपी) १.२३ टक्के रक्कम यासाठी खर्च करण्यात आली. येत्या तीन वर्षांत

म्हणजे २०१० पर्यंत हे प्रमाण २ टक्के एवढे आणि २०२० पर्यंत २.५ टक्के इतके वाढवणे.

● नागरी आणि लष्करी संशोधनसंस्थांमधील सहकार्य वाढवणे व व्यवस्थापनाबाबत त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणे.

● संशोधन प्रकल्प हाती घेणाऱ्या कंपन्यांना भांडवल उपलब्ध व्हावे तसेच संशोधन करीत असणाऱ्या कंपन्यांनी यात अधिक गुंतवणूक करावी, या उद्देशांनी बँकांच्या धोरणात बदल करणे.

● संशोधनसंस्थांच्या तसेच संशोधकांच्या संदर्भात मूल्यमापनाची नवीन पद्धत अवलंबिणे.

चीनने असे महत्त्वाकांक्षी धोरण आखले असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची दखल घेतली जाणे स्वाभाविकच होते. अमेरिकेतील तज्ज्ञ डेम्स सायमन यांच्या मते चीनने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एका महत्त्वाच्या कालखंडात प्रवेश केला आहे. चीन उत्तुंग भरारी घेण्यास सज्ज झाला आहे. फक्त ही झेप केव्हा घेतली जाणार एवढाच प्रश्न आहे. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ ते चार मुद्दे मांडतात. एक म्हणजे, राष्ट्रीय पातळीवर केलेल्या चिंतनातून ही योजना आखण्यात आली असून ती अधिक आधुनिक आहे. दुसरे म्हणजे, सरकारचे परंपरागत पद्धतीचे नियोजन आणि नियंत्रण बाजूला पडून उद्योजक आणि खाजगी क्षेत्राला यात अधिक वाव मिळणार आहे. तिसरे म्हणजे, विद्यापीठ पातळीवर विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे आणि एकूण शिक्षणाचा दर्जाही सुधारताना दिसतो आहे. चौथे म्हणजे युरोप, जपान आणि अमेरिका यांच्याबरोबर सहकार्याचा सेतू उभारून आपल्या संशोधनपद्धतीचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा चीनचा प्रयत्न आहे.

'चीनमधील विज्ञानाला एका बाजूने फार चांगले दिवस आले आहेत तर दुसऱ्या बाजूने विज्ञान एका विचित्र कोंडीत अडकले आहे,' असे मत ओरेगॉन विद्यापीठातील प्राध्यापक रिचर्ड सटमेअर यांनी मांडले आहे. तंत्रज्ञानाच्या सापळ्यात (टेक्नॉलॉजिकल ट्रॅप) चीन अडकला आहे असे त्यांना वाटते. कारण, चीनची आर्थिक वाढ व विकास ही आयात केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. चिनी कंपन्यांमधील फक्त ०.०३ टक्के कंपन्याजवळ ते वापरत असणाऱ्या तंत्रज्ञानाचे 'बौद्धिक स्वामित्व अधिकार' (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स) आहेत. हे अधिकार नसणे हा नफा मिळवण्यातील मोठा अडसर ठरतो. दुसरीकडे, विद्यापीठे व संशोधनसंस्था यांच्या दर्जात सुधारणा होत असली तरी संशोधन व विकास तसेच पेटंट मिळवणे यात

चीनमधील उद्योजक बरेच पिछाडीवर आहेत. हे उद्योजक एकूण उलाढालीच्या केवळ ०.५६ टक्के रक्कम संशोधन व विकास यांवर खर्च करतात. मोठ्या उद्योगांमध्येदेखील ही टक्केवारी केवळ ०.७१ एवढीच आहे.

चीनच्या धोरणाबाबत खुद्द चीनमधील संशोधक काय म्हणतात ? बीजिंग येथील तंत्रज्ञान विद्यापीठाचे उपाध्यक्ष झे झांग हे 'चायनीज असोसिएशन फॉर सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (CAST) या संस्थेशीही संलग्न आहेत. ते म्हणतात, चीनमध्ये सर्व जण नवशोधनाची चर्चा करीत आहेत, पण 'नवशोधन' म्हणजे नेमके काय हेच मुळात समजून घेण्याची गरज आहे. कारण, याबाबतीत चीन अद्याप पहिल्याच पायरीवर आहे. नवशोधनाला चालना देणे आणि ते घडवून आणण्याची राजकीय यंत्रणेची क्षमता असणे यांत बरेच प्रश्न निर्माण होताना दिसतात. या संदर्भात CASTमध्ये काही बदल घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण असे बदल घडवून आणणे हे त्यांना फारच कठीण गेले. त्यांच्या मते, चीनमधील कंपन्यांना वेगळा व कल्पक दृष्टिकोण अवलंबावा लागणार आहे आणि याची मानसिक तयारी झाली आहे, असे दिसत नाही. सरकारच्या अखत्यारीतील कंपन्यांमध्ये तर कंपनी प्रमुखांची निवड ही पक्षातर्फेच केली जाते. शिवाय, कंपनीच्या भागधारकांना जसा कंपनीच्या नफ्यात व कामकाजात रस असतो, तसा रस या कंपन्यांच्या प्रमुखांना वा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना असतोच असे नाही, हे वास्तव नवशोधनासाठी अडचणीचे ठरू शकते.

संशोधनाबाबत आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे चीनमध्ये वाङ्मयचौर्य मोठ्या प्रमाणावर केले जाते. झांग यांनी आपल्या संशोधनासाठी मिळवलेली माहिती त्यांच्याच काही माजी विद्यार्थ्यांनी चोरली असल्याची घटना अलीकडचीच आहे. अशा परिस्थितीत संशोधनांत सहकार्य, विश्वास या गोष्टी दूरच राहतात. मग सर्व संशोधक बंद दारामागे काम करतात आणि नवशोधनाला हे अनिष्ट ठरते. पण हळूहळू यात बदल होतील असा आशावाद ते व्यक्त करतात. अमेरिकेतील 'सिलिकॉन व्हॅली'त संशोधनाबाबत जसे वातावरण आहे तसे चीनमध्ये नाही. त्यामुळे तेथे जशी धोरणे राबवली जाऊ शकतात तसे करणे चीनमध्ये शक्य होत नाही. अजूनही तेथे पक्षाच्या चौकटीत आपले मत मांडावे लागते. पाश्चात्य देशांतील कल्पना तशीच्यातशी स्वीकारली जात नाही, तर, चीनमध्ये मान्य होईल अशी मांडणी करावी लागते. अलीकडे मात्र चीनमधील धोरणकर्त्यांनी थोडे खुलेपणाचे धोरण अवलंबिले असून आपल्या नवीन योजनेवर चर्चा घडून येण्यास अनुकूल मत दर्शविले आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात चीनला नाविन्याच्या दिशेने जायचे असेल तर सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयानेच फक्त याबाबत पुढाकार घेण्यापेक्षा इतरही संस्थांना त्यात सहभागी करून घ्यावे लागणार आहे. 'चायनीज अकॅडमी ऑफ सायन्सेस' (CAS) ही एक महत्त्वपूर्ण संस्था असून या संस्थेने स्वत:हूनच गेल्या दशकात 'नॉलेज इनोव्हेशन प्रोग्रॅम' राबविण्याचा प्रयत्न केला. या संस्थेला नवीन योजनेत मोठी भूमिका निभवावी लागेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

या घडामोडींमध्ये नोंद घेण्यासारखा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे चीनच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमागे 'तंत्र-राष्ट्रवाद'ही (टेक्नो-नॅशनॅलिझम) आहे. याची मुळे शोधण्यासाठी एकोणिसाव्या शतकापर्यंत मागे जावे लागेल. औद्योगिकीकरणाच्या काळात चीन पाश्चात्य देशांच्या मागे पडल्याचा सल चीनमधील अनेक धुरीणांच्या मनांत होता/आहे. १९४९मध्ये 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना'ची स्थापना झाल्यानंतर चीनला तत्कालिन सोविएत रशियाकडून मिळणाऱ्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागत होते. त्या नंतरच्या काळात मात्र चीनने तंत्रज्ञानाच्या काळात स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न केला. त्या काळापासून चालू झालेला हा 'तंत्र-राष्ट्रवाद' आता नव्या टप्प्यावर येऊन पोचला आहे. तो सर्व संबंधित विषयांमध्ये दिसून येतो आहे. अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात चीनने अलीकडे केलेली भरीव कामगिरी त्याचेच निदर्शक आहे. उदाहरणार्थ - चीनचे दोन अवकाशवीर पाच दिवसांचा अवकाशदौरा करून १७ ऑक्टोबर २००५ रोजी परतले, तेव्हा त्यांचे मोठे स्वागत करण्यात आले. तसेच अलीकडे चीनने अवकाशात उपग्रह नष्ट करण्याचा प्रयोग करून आणखी एक पाऊल पुढे टाकले. भविष्यातही अवकाशविषयक विविध प्रयोगांना गती देण्याचा चीनचा मानस आहे. 'तंत्र-राष्ट्रवादा'बरोबरच चीनमध्ये 'राष्ट्रवाद'ही आकाराला आला असून त्यासाठी 'शांततापूर्ण मार्गाने उदय' आणि 'शेजारी राष्ट्रांशी चांगले संबंध' या दोन बाबी प्राधान्याच्या ठरल्या आहेत. चीनचे धोरणकर्ते 'वैश्विक राष्ट्रवादा'ला (ग्लोबलाइज्ड नॅशनॅलिझम) उत्तेजन देत आहेत, असे मत चीनमधील घडामोडींचा बारकाईने अभ्यास करणारे तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

चीनच्या विज्ञानविषयक धोरणाची फलनिष्पत्ती काय होईल, याचे उत्तर काळाच्या उदरात लपले आहे. मात्र, या सर्व घडामोडी पाहता विज्ञानातील महासत्ता बनण्याच्या दिशेने चीनची पावले पडत आहेत या विचाराला बळकटी मिळते, असे मत या क्षेत्रातील जाणकारांनी मांडले आहे.

# वितळते 'परमाफ्रॉस्ट' आणि भडकते वणवे

उत्तर ध्रुवीय प्रदेशातील पर्यावरणात 'ग्लोबल वॉर्मिंग'पायी साकारत असलेल्या बदलांची अधिकाधिक अभ्यास-निरीक्षणांती आकलनाच्या कक्षेत येणारी नवनवीन परिमाणे हवामानाभ्यासकांना अलीकडे उत्तरोत्तर अस्वस्थ बनवू लागली आहेत. विशेषतः, लोकसंख्येच्या दृष्टीने अलास्कामधील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे नगर म्हणून गणल्या जाणाऱ्या फेअरबॅन्क्स या शहराच्या परिसरात गेल्या दोन-चार वर्षांत प्रकर्षाने अनुभवास येणारे वातावरणीय तसेच भौगोलिक बदल हे एकाच वेळी चिंत्य आणि तितकेच चिंताजनक असे आहेत. अलास्काच्या अंतर्भागात वस्ती करणाऱ्यांच्या पायाखालील जमीन अक्षरशः सरकते-फाटते आहे, तर, उन्हाळ्याच्या दिवसांत परिसरात भडकणाऱ्या वणव्यांपायी फेअरबॅन्क्सवासियांनाच केवळ नव्हे तर घरातील पाळीव कुत्र्यांनाही नाकाला 'मास्क' लावल्याखेरीज घराबाहेर पाऊल घालणे अशक्यप्राय बनते आहे. दोहोंतील समान दुवा म्हणजे, सरकत्या जमिनीस आणि भडकत्या वणव्यांना कारणीभूत ठरत आहे ते पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचे अरिष्टप्राय आव्हान !

चारही बाजूंनी पडलेला जंगलाचा फेर ही फेअरबॅन्क्सची खासियत. ऋतूबदलाची चाहूल देताना सरत्या उन्हाळ्यात होणाऱ्या वादळवावटळपूर्ण वर्षावात जमिनीकडे झेपावणाऱ्या विजांनी या जंगलांत वणवे लागणे, ही तशी नित्याचीच बाब. असे वणवे जंगलांत पेटले की दिवसेंदिवस शहर परिसर धुराने कोंदून जावा, हीदेखील फेअरबॅन्क्सवासियांच्या अंगवळणी पडलेली जीवनराहाटी. वणवे फारच भडकले तर शहर व्यापून दशांगुळे वर उरणारे धुराचे पटल प्रसंगी आठवडेच्याआठवडे विरळ होऊ नये, याचेही नागरिकांना अप्रूप उरलेले नाही. परंतु, अलीकडील काळात मात्र वीज पडून भवतालच्या जंगलात एखाद्या ठिकाणी आग लागली की संपूर्ण फेअरबॅन्क्स शहरावर धुरापायी जणू काही गडद धुक्याची दुलईच पांघरली जाते. अगदी घनदाट धुके...आणि त्याच्याच जोडीला शहरभर दरवळणारा जळक्या रबरासारखा एक उग्र दर्प. अशा वातावरणात, पाय मोकळे करण्यासाठी पाळीव कुत्र्यांना घराबाहेर घेऊन जाणारे शहरवासी ज्याप्रमाणे आपले नाकतोंड झाकून घेतात त्याचप्रमाणे आपल्या कुत्र्यांच्या चेहेऱ्यावरही 'मास्क' चढवितात !

वणव्यांचे हे वेळापत्रक बदलत असल्याचा अनुभव गेल्या दोन-तीन वर्षांपासून येतो आहे. दोन वर्षांपूर्वी हे वणवे नेहेमीपेक्षा अंमळ आधी म्हणजे जूनच्या प्रारंभीच पेटले. एरवीपेक्षा तुलनेने लवकर पेटलेले हे वणवे लवकर विझले मात्र नाहीत. सुमारे अडीच महिने, म्हणजे, पार ऑगस्ट महिन्याच्या मध्यापर्यंत जंगले धगधगतच होती. या अग्निकांडात सुमारे ६३ लाख एकर क्षेत्रावरील वनसंपत्ती आणि झाडझाडोरा जळून भस्मसात झाला. फेअरबॅन्क्सच्या लेखी हा आजवरचा एक विक्रमच ! पर्यावरणतज्ज्ञ तसेच हवामानाभ्यासकांच्या होऱ्यानुसार वणव्यांच्या या बदललेल्या वेळापत्रकाचा तसेच तीव्रतेचा थेट संबंध हा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील बदलत्या वातावरणाशी, पृष्ठभागाच्या वाढत्या तापमानाशी आहे. कारण, अलीकडील काळात फेअरबॅन्क्सच्या परिसरातील वातावरण हे अपवादात्मकरीत्या कोरडे आणि ऊष्ण बनत असल्याचे शास्त्रज्ञांचे निरीक्षण सांगते. उन्हाळ्यातील तापमानाच्या सरासरीची कमान चढती आहे तर पर्जन्यमानाची कमान उतरती आहे.

एकीकडे जंगलांत वणवे भडकत आहेत तर दुसरीकडे पायाखालची जमीन शब्दशः सरकते-दुभंगते आहे. उत्तर ध्रुवीय प्रदेशासारख्या हिममय प्रदेशात गोठलेल्या बर्फाचा सघन पापुद्रा भूगर्भात तयार झालेला असतो. जणू काही जमिनीच्या पायथ्याला जडलेले गोठीव बर्फाचे अस्तरच ! तांत्रिक परिभाषेत या अस्तरास 'परमाफ्रॉस्ट' असे संबोधले जाते. किमान दोन वर्षे गोठलेल्या अवस्थेत राहिलेला बर्फाळ पट्टा म्हणजे 'परमाफ्रॉस्ट'. ही झाली शास्त्रीय व्याख्या. पायाखालच्या जमिनीला खालच्या बाजूने हे अस्तर तोलून धरते. उत्तर ध्रुवीय प्रदेशातील बव्हंश जमीन ही या परमाफ्रॉस्टचे अस्तर लाभलेली अशीच आहे. किंबहूना, उत्तर भूगोलार्धातील जवळपास पाव हिस्सा जमीन (सुमारे ५५० अब्ज एकर भूक्षेत्र) ही गोठलेल्या बर्फाचे अस्तर असलेली अशीच आहे. सायबेरियासारख्या हिमबहुल प्रांतात या परमाफ्रॉस्टची खोली मैलोगणती असते. अलास्कामध्ये मात्र त्यात बरीच विविधता आढळून येते. काही ठिकाणी परमाफ्रॉस्ट शे-दोनशे फूट सखोल आहे तर, काही जागी ही खोली कित्येक हजार फुटांची आहे.

बदलत्या वातावरणापायी परमाफ्रॉस्टचे अस्तर ठायीठायी विरळ बनू लागल्याचे अलीकडे अनुभवास येते. साहजिकच, आधाराभूत असणारे पायाचे अस्तरच खचल्याने जमिनीच्या पृष्ठभागास भेगा पडतात, ती फाटते. त्यापायी, शहरातील रस्त्यांवर एका रात्रीत तयार झालेली भगदाडे बुजवत बसणे, ही फेअरबॅन्क्स शहराच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या लेखी एक डोकेदुखीच झाली आहे. वाढत्या तापमानापायी परमाफ्रॉस्ट

वितळले की पायातळीची जमीन अक्षरशः सरकते आणि घरादारांची पडझड होते. झाडे कलतात, उन्मळून पडतात. हवामानतज्ज्ञांच्या निरीक्षण-नोंदींनुसार फेअरबॅन्क्सच्या परिसरात परमाफ्रॉस्टचे तापमान वाढते आहे. उत्तर ध्रुवीय प्रदेशातील तापमान एरवी पाण्याच्या गोठणबिंदूच्या (तपमानाच्या ज्या पातळीवर पाणी गोठून त्याचे रूपांतर बर्फात होते तो बिंदू) कितीतरी खाली असते. परंतु, आता मात्र ते काही ठिकाणी जवळपास गोठणबिंदूच्या पातळीपर्यंत वाढलेले दिसते. केवळ इतकेच नाही तर, फेअरबॅन्क्समध्ये अनेक जागी परमाफ्रॉस्ट वितळू लागल्याचेही दृश्य अलीकडे दिसू लागले आहे (गेल्या १ लाख २० हजार वर्षांत हे चित्र प्रथमच दिसते आहे !). विशेषतः, शहराच्या ज्या भागांत रस्ते वा घरे यांची बांधकामे चालू आहेत वा झालेली आहेत अशा भागांत तर परमाफ्रॉस्ट वितळण्याची प्रक्रिया अधिकच प्रकर्षाने अनुभवास येते. भूगर्भात जसजसे खोलवर जावे तसतसे पृथ्वीच्या पोटातील उष्णतेमुळे परमाफ्रॉस्टचे तापमानही वाढत जाते. परिणामी, परमाफ्रॉस्टच्या तापमानाची सर्वसाधारण प्राकृतिक रचनाच मुळात अशी असते की परमाफ्रॉस्टच्या पृष्ठभागाशी तापमान किमान असते तर त्याच्या तळाशी ते कमाल असते. परंतु, परमाफ्रॉस्टच्या तापमानासंदर्भात अलास्कामध्ये मात्र आगळाच 'पॅटर्न' बघावयास मिळतो. अपेक्षेप्रमाणे परमाफ्रॉस्टच्या तळाशी त्याचे तापमान हे कमाल असल्याचे आढळते. मात्र, किमान तापमान हे परमाफ्रॉस्टच्या पृष्ठभागाशी अनुभवास येण्याऐवजी मधल्याच कुठल्या तरी स्तरावर ते किमान पातळीवर पोहोचलेले असते.... आणि परमाफ्रॉस्टच्या पृष्ठभागाशी ते उबदार असते ! पृष्ठभागाशी परमाफ्रॉस्ट उबदार असणे, हे, शास्त्रज्ञांच्या प्रतिपादनानुसार तापत्या पर्यावरणाचे हमखास लक्षण आहे. १९८०च्या दशकापासूनच अलास्काच्या बहुतांश भागात परमाफ्रॉस्टच्या तापमानात जवळपास तीन अंशांनी वाढ झाल्याचे पर्यावरणतज्ज्ञांना आढळून आले आहे. अलास्काच्या काही भूभागांत तर ही वाढ सुमारे सहा अंशांइतकी आहे.

सगळ्यात गमतीचा भाग असा की उत्तर ध्रुवीय प्रदेशातील बराचसा परमाफ्रॉस्ट हा अस्थिर, ऋतुमानानुसार बदलत्या जडणघडणीचा असा आहे. हा परमाफ्रॉस्ट हिवाळ्यात गोठतो तर उन्हाळ्यात वितळतो. परमाफ्रॉस्टच्या या उभयावस्थेस परमाफ्रॉस्टचा 'ॲक्टिव्ह लेअर' असे नामाभिधान आहे. हा 'ॲक्टिव्ह लेअर' झाडाझुडुपांच्या, बर्फाळ प्रदेशात आढळून येणाऱ्या सदाहरित वृक्षांच्या वाढीस अनुकूल वातावरण पुरवितो. ज्या ठिकाणी झाडझाडोऱ्याच्या वाढीस वातावरण अतिशय पूरक

असेल त्या ठिकाणी चांगले मोठमोठे सदाहरित वृक्ष वाढल्याचे दिसून येते. ज्या भागात अशी अनुकूलता फारशी नसेल त्या परिसरात लहानसहान, खुरटी झाडीझुडुपे तग धरून टिकतात. उत्तर ध्रुवीय प्रदेशातील हवामान एकंदरच कमालीचे थंड असल्याने झाडेझुडुपे मेली तरी ती पूर्णतः कुजत नाहीत. अर्धकुजल्या अवस्थेत ती थिजून राहतात. अशा अर्धकुजक्या गचपनातूनच नवनवीन झाडे-धुमारे फुटतात, वाढतात. या वनस्पतीही जेव्हा केव्हा मरतात तेव्हा त्याही त्यांच्या पूर्वसुरींप्रमाणेच अर्धनासक्या-कुजल्या अवस्थेत पडून राहतात. कालांतराने अशी अर्धकुजकी झाडेझुडे, पालापाचोळा 'ॲक्टिव्ह लेअर'च्या खालच्या थरांत ढकलला जातो. या प्रक्रियेला 'क्रायोटर्बेशन' अशी तांत्रिक संज्ञा आहे. या वनस्पती अशा अवस्थेत हजारो वर्षेही राहू शकतात. गेल्या हिमयुगाच्या मध्यास याच पद्धतीने गाडले गेलेले गवत फेअरबॅन्क्सच्या परिसरातील परमाफ्रॉस्टमध्ये अगदी अलीकडे चक्क हिरव्यागार स्थितीत सापडले ! परमाफ्रॉस्टमध्ये साचलेला असा अर्धकुजका झाडझाडोरा कार्बन डायॉक्साइड वायू पकडून ठेवतो.

पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या वाढत्या तापमानाचा जीवसृष्टीला असलेला धोका नेमका याच ठिकाणी सक्रिय बनण्याच्या शक्यता बळावतात. परमाफ्रॉस्टमध्ये लक्षावधी वर्षे गोठून पडलेला अर्धकुजका, नासका जैविक कचरा, झाडझाडोरा वाढत्या तापमानामुळे विघटन पावू लागतो आणि परिणामी त्यात धरून ठेवला गेलेला कार्बन डायॉक्साइड अथवा मिथेनसारखा अधिक ताकदवान 'ग्रीनहाउस' वायू मोकळा होऊ लागतो. उत्तर ध्रुवाच्या काही भागात या प्रक्रियेला या पूर्वीच प्रारंभ झालेला आहे. स्वीडनमधील शास्त्रज्ञ तेथील अबिस्को शहराजवळील दलदलीतून हवेत सोडल्या जाणाऱ्या मिथेनचे मोजमाप करण्यात गेली तब्बल ३५ वर्षे गुंतलेले आहेत ! पृथ्वीच्या वाढत्या तापमानाबरोबर परमाफ्रॉस्टचेही तापमान वाढत असल्याने त्यात जखडला गेलेला मिथेन हवेत सोडला जाण्याचे प्रमाण वर्धिष्णू बनले आहे. ऊबदार बनल्याने परमाफ्रॉस्टचा 'ॲक्टिव्ह लेअर' झाडझाडोऱ्याच्या वाढीस अधिकच पूरक पर्यावरण पुरवितो आहे. परिणामी, नवीन वनस्पतींची वाढ, त्यांचा नाश आणि नवीन झाडाझुडुपांची त्यातून पुनश्च वाढ हा चक्रनेमिक्रम उत्तरोत्तर गतिमान बनतो आहे. त्यातून परमाफ्रॉस्टमधील कार्बन डायॉक्साइडचे साठे वाढतच आहेत. जगभरातील परमाफ्रॉस्टच्या उदरात असा एकंदर किती कार्बन डायॉक्साइड साठलेला आहे, याचे नेमके मोजमाप आजमितीस कोणाकडेही नाही. काही अंदाजांनुसार हा साठा आहे ४५० अब्ज टनांचा. हा सगळाच्या सगळा वायू हवेत सोडला गेला तर.....?!

# चतु:सूत्री 'सेझ'च्या आकर्षणाची

अनुकरण ही एक सहजप्रवृत्ती आहे. जितकी सहज तितकीच सार्वत्रिकही. अनुकरणातून आपण बरेचदा बरेच काही शिकत असतो. आपली पिंडप्रकृती पाहता आपल्या दृष्टीने योग्य काय - अयोग्य काय, उचित काय - अनुचित काय याचा आपला आपल्यालाच बोध हा कित्येकदा अनुकरण केल्याखेरीज होतच नाही. हा बोध झाला की आपला आपल्याशीच संवाद सुरू होतो. त्यातूनच आपल्याला खूप काही समजत-उमजत जाते. आजमितीस जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये याच प्रकारचे मंथन चालू आहे. या मंथनाचा केंद्रबिंदू आहे - स्पेशल इकॉनॉमिक झोन - एसईझेड - सेझ -विशेष आर्थिक क्षेत्रे. रोजचे वर्तमानपत्र डोळ्यासमोर धरले तरी पहिल्या पानावर 'सेझ'विषयक बातमी वा मजकूर नाही असा दिवस आपल्या देशातही अलीकडे अभावानेच उगवतो आहे. तब्बल चार दशकांपूर्वी तैवानने या संकल्पनेचा ओनामा केला. निर्यातोन्मुख, निर्यातप्रधान अशा वेगवान आर्थिक विकासाचे 'मॉडेल' तैवानने जगासमोर ठेवले ते केवळ ७२ हेक्टरच्या एका भूपट्ट्यावर 'सेझ'ची उभारणी करून. तैवानच्या या प्रयोगाचे अनुकरण केले ते त्याचाच सख्खा शेजारी असणाऱ्या दक्षिण कोरियाने. तिथून पुढे मग या अनुकरणाची जणू लाटच आली. आज चीन आणि भारतासारखी वजनदार आशियाई राष्ट्रेही याच लाटेवर स्वार झालेली दिसतात. या अनुकरणातून देशोदेशी अंतर्मुखताही निपजते आहे. अशी अंतर्मुखता हीच 'सेझ'विषयक विचारमंथनाची जननी ठरली आहे.

पुरेपूर एक तपापूर्वी, म्हणजे, १ जानेवारी १९९५ रोजी वैश्विक पटावर जागतिक व्यापार संघटनेचा अवतार झाला आणि इथून पुढे 'सेझ'चे गारुड जगावर फार काळ आपली सद्दी चालवू शकणार नाही, अशी धारणा मूळ धरू लागली. आज ना उद्या उभे जगच जर मुक्त, निर्बंधरहित व्यापारास, आयातनिर्यातीस शिरोधार्य मानणार असेल तर देशाच्या एखाद्या भूभागावरच काय ते मुक्त व्यापार-उद्योग-उत्पादनाचे बेट निर्माण करणाऱ्या 'सेझ'च्या 'मॉडेल'ची मातब्बरी ती किती, या तर्कशास्त्राचे अधिष्ठान त्या धारणेस लाभलेले होते. परंतु, प्रत्यक्षात झाले ते उलटेच. जागतिक व्यापार संघटनेच्या रथास जणू काही अडथळ्यांच्या शर्यतीस तोंड द्यावे लागत आहे आणि दुसरीकडे

'सेझ'चा वारू मात्र बेलाग, बेलगाम चौखूर दौडत आहे. असे असले तरी त्याच्याही आजवरच्या दौडीस लगाम घालणाऱ्या प्रेरणा आज ठयीठयी प्रबळ होताना दिसतात. कामगार हक्कांच्या रक्षणाबाबत जागृत असणाऱ्या संघटना-व्यासपीठांच्या मते तर मुक्त, निरंकुश भांडवलशाहीस अनुग्रहाचे पाठबळ पुरविणारे हे 'सेझ'प्रणित विकासप्रारूप म्हणजे श्रमिकांवरील एक मोठे गंडांतरच आहे.

कामगार संघटना वा श्रमिकांच्या हक्कांची पायमल्ली होऊनये यासाठी झगडणाऱ्या विचारसरणींनाच काय ती 'सेझ'प्रणित विकासाच्या युक्तायुक्ततेबाबत बख्खळ आणि सबळ 'रिझर्वेशन्स' आहेत, असेही समजण्याचे कारण नाही. 'सेझ'प्रणित विकासाच्या अनिवार्यतेबाबत, त्याच्या इष्टानिष्टतेबाबत अर्थतज्ज्ञांमध्येही निरपवाद मतैक्य असल्याचे अनुभवास येत नाही. 'सेझ'चे प्रारूप कोणत्या देशांना, त्यांच्या विकासाच्या कोणत्या टप्प्यावर, उदारीकरणाच्या कोणत्या चरणात कसे, कितपत व कोठवर उपकारक ठरू शकेल यांबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्येच मतमतांतरे आणि वाद-प्रवाद दिसून येतात. निर्यातोन्मुख, सरकारने उदारहस्ते देऊ केलेल्या नानाविध सवलती-अनुदानांच्या टेकूंवर तोललेली अशी 'सेझ'प्रणित आर्थिक प्रगतीची प्रणाली भारताच्या दृष्टीने आज कितपत अनिवार्य आणि दीर्घकालीन सातत्यशीलतेचा विचार करता कितपत स्वागतार्ह आहे, असा जो प्रश्न आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे माजी मुख्य अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी उपस्थित केला आहे, तो या संदर्भात लक्षवेधक ठरतो. रघुराम राजन यांनी 'सेझ'प्रणित आर्थिक विकासप्रक्रियेबाबत नोंदविलेले आक्षेप दुहेरी आहेत. एक म्हणजे 'सेझ'मधील उद्योगांना देऊ केलेल्या करविषयक सवलतींपायी सरकारच्या तिजोरीत खड्डा पडून अंती त्याचा ताण सार्वजनिक वित्त व्यवस्थेवर आणि आपातत: सरकारच्या गुंतवणूक क्षमतेवर येतो. दुसरे म्हणजे, विकासाचा हा पंथ अनुसरल्याने अर्थव्यवस्थेत ठयीठयी विकासाची काही बेटेच काय ती निर्माण होतात.

बरे, 'सेझ'चा हा प्रयोग सार्वत्रिक, सार्वकालिक उपकारक आणि हमखास यशस्वी ठरल्याचे दाखलेही सातत्याने मिळत नाहीत. जे काही विशिष्ट 'सेझ' काही देशांत यशदायी ठरतात त्यांचे तसेच गोमटे फळ दुसऱ्या देशातही मिळेलच याची शाश्वती नसते. तैवान, दक्षिण कोरिया, चीन तसेच व्हिएतनाम या देशांमध्ये ज्या प्रकारच्या 'सेझ'चा प्रयोग ज्या पद्धतीने फलदायी ठरला त्याच प्रयोगाचे फिलिपाइन्स, थायलंड आणि इन्डोनेशिया या देशांमधील अनुकरण मात्र साफ अयशस्वी शाबित झाले. याची कारणे ही देशकालपरत्वे वेगवेगळी असली तरी देशाच्या एखाद्याच

भूभागावर देऊ केलेल्या अत्याधुनिक, अत्युत्कृष्ट पायाभूत सेवासुविधा, करविषयक सवलती, अनुदाने, परकीय भांडवल तसेच तंत्रज्ञानास मुक्तद्वार यांसारख्या बाबी एकंदरच अर्थव्यवस्थेचा नूर आरपार पालटण्यास पुरेशा ठरत नाहीत, हे वास्तव थोड्याफार फरकाने सर्वत्रच सिद्ध झाले आहे. 'सेझ' प्रणित आर्थिक विकासाचा प्रयोग सुफळ संपूर्ण होण्यास केवळ दर्जेदार पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा ही एकच बाब पर्याप्त नसते. तर, त्याच्याच जोडीने देशांतर्गत एकंदरच राजकीय स्थैर्य, उदारीकरणाप्रतीची सरकारची बांधिलकी या गोष्टीही तितक्याच कळीच्या ठरतात. याही पलिकडे आणखी एक मुद्दा मोठाच संवेदनशील ठरतो. 'सेझ' मध्ये कार्यरत असणाऱ्या परकीय (अथवा देशीही) उद्योगांचे देशांतर्गत स्थानीय उत्पादन-निर्मिती क्षेत्राशी कशा प्रकारचे उत्पादक संबंध निर्माण होतात, यावरही 'सेझ' प्रणित आर्थिक विकासाच्या प्रयोगाची व्यापक उपयुक्तता निर्भर असते.

'सेझ' च्या प्रयोगाचा ताळेबंद हा असा संमिश्र असला तरी जगभरच 'सेझ' प्रती असलेली 'क्रेझ' मात्र अजूनही मावळताना दिसत नाही. या वास्तवामागील कारणे काय असावीत, असा प्रश्न मग स्वाभाविकपणेच उपस्थित होतो. 'सेझ' प्रतीच्या या आकर्षणामागे जगभरच आढळून आलेली कारणप्रणाली ही चौपदरी आहे. 'सेझ' च्या गारुडाची जणू चतुःसूत्रीच ! ही चौपदरी कारणमीमांसा खालीलप्रमाणे मांडता येईल :

### (१) विकासाच 'शॉर्ट कट' :

अनेकविध कारणांपायी ज्या देशांना आपापल्या अर्थकारणात उदारीकरण, सर्वंकष आर्थिक सुधारणा आणि पुनर्रचनेचे ऐलान करणे अवघड जाते अशा देशांना 'सेझ' च्या प्रयोगाद्वारे आर्थिक नवरचनेस, अशा नवरचनेस पूरक ठरणाऱ्या विचारविश्वास चंचूप्रवेश उपलब्ध करून देता येतो. विशेषतः ज्या देशांमध्ये पूर्णतः केंद्रीभूत अशा नियंत्रित अर्थकारणाचा पगडा प्रदीर्घ काळ टिकून होता व आहे अशा देशांच्या लेखी तर 'सेझ' चा प्रयोग ही जणू नवविश्वाचे दर्शन घडविणारी खिडकीच होती. १९६०च्या दशकात तैवानने, १९७०च्या दशकात चीनने तर १९८०च्या दशकात व्हिएतनामने आपापल्या अर्थव्यवस्थांच्या पुनर्रचनेस हात घातला. या अर्थव्यवस्थांना बदलाची नितांत निकड होती, मात्र, हे बदल केंद्रीय व्यवस्थेच्या पोलादी पकडीमधून साकारणारे असेच असणे हे अपरिहार्य होते. एका अर्थाने या देशांमधील सरकारे ही सरकार प्रवर्तित उदारीकरणाचा प्रयोग राबवू पाहत होती. अर्थव्यवस्थेस आवश्यक तेथे व आवश्यक तेवढी मोकळीक द्यावयाची मात्र ती निरंकुश असता कामा नये, याबाबत

दक्षता बाळगावयाची, हा त्यांचा खाक्या होता. पुनर्रचनेखेरीज अर्थकारणाची प्रगती नाही, परंतु त्याच वेळी एकदम मोठ्या प्रमाणावरील सर्वसमावेशक सुधारणा राबवताही येत नाहीत, अशी ही कोंडी होती. सुधारणांचा पायरव ऐकू येत नसल्याने परकीय भांडवल आणि तंत्रज्ञान अर्थकारणात पाऊल घालण्यास अनुत्सुक आहेत, याचीही पुरेपूर जाणीव होत होती. अशा वेळी, देशाच्या एखाद्या मर्यादित भूभागावर सवलती-सुधारणा-सुविधांचा सडा शिंपून परकीय भांडवलास पायघड्या घालणे हा त्यातल्या त्यात व्यवहार्य पर्याय ठरला. विशेषतः चीनसारख्या कडव्या साम्यवादी देशाच्या लेखी 'सेझ'चा प्रयोग हा मर्यादित उदारीकरणाद्वारे वेगवान विकासाची कास धरणारा जणू 'शॉर्ट कट'च ठरला. सर्व देशभरात जी उदार धोरणे राबविता येत नाहीत, अथवा राबविणे जोखमीचे ठरते अशी धोरणे एखाद्या मर्यादित भूभागावर राबविल्याने अशा प्रकारच्या बदलांचे होणारे आर्थिक-सामाजिक परिणाम, या बदलांना देशवासियांचा, अर्थकारणातील आर्थिक-औद्योगिक-व्यापारी-व्यावसायिक घटकांचा मिळणारा प्रतिसाद, ही धोरणे यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेविषयक धोरणांची अंमलबजावणी करीत असताना येणाऱ्या अडचणी या सारख्या विविध बाबींचा मागोवा घेता येतो. मुख्य म्हणजे सरकारी नियंत्रित उदारीकरणाचा प्रयोग व्यवहारात आणता येतो. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, सरकारी प्रशासनाच्या कार्यप्रणालीचा, कार्यक्षमतेचा, परिणामकारकतेचा (म्हणजे एकंदरच 'गव्हर्नन्स'चा) पोत सर्वत्र एका झटक्यात बदलणे, ही बाब कोणत्याही सरकारच्या सहजासहजी आवाक्यात येणारी नसते. रघुराम राजन यांच्या मते, 'सेझ'च्या प्रयोगाचे वैशिष्ट्य नेमके इथेच जाणवते. 'सेझ'च्या माध्यमातून अतिशय काटेकोर, कार्यक्षम आणि परिणामकारक 'गव्हर्नन्स'चा वस्तुपाठ सरकार यंत्रणा समोर ठेवू शकते. 'गुड गव्हर्नन्स'ची अशी बेटे एकदा का देशात तयार झाली की 'डेमॉन्स्ट्रेशन इफेक्ट'द्वारे त्या कार्यशैलीची पुनरावृत्ती देशाच्या कानाकोपऱ्यात घडवून आणण्यास सरकारला बळ मिळू शकेल, असे रघुराम राजन यांचे या संदर्भातील विश्लेषण आहे.

### (२) झटपट रोजगारनिर्मिती :

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या प्रारंभीच्या काळात 'सेझ'चा उपक्रम अंमलात आणून बघणाऱ्या तैवान व चीनसारख्या देशांच्या डोळ्यासमोर या खटाटोपाद्वारे अर्थव्यवस्थेत परकीय गुंतवणूक तसेच तंत्रज्ञानास आवतण देण्याचा हेतू प्रधान होता. परंतु, त्याच वेळी अर्थव्यवस्थेत थोड्याच काळात आणि मोठ्या प्रमाणावर झटपट

रोजगारनिर्मिती करण्याचेही उद्दिष्ट त्यामागे होते. व्हिएतनाममधील निर्यातप्रक्रिया क्षेत्र कार्यान्वित झाले तेव्हा तिथे एकूण २० हजार श्रमिकांना रोजगार उपलब्ध झाला. परंतु, थोड्याच अवधीत ही संख्या दुपटीपेक्षा अधिक वाढून ५५ हजारांवर गेली. येत्या सात ते आठ वर्षांत हाच आकडा आणखी दुपटीने वाढेल असा अदमास संबंधितांकडून व्यक्त करण्यात येत आहे. भारतातही चित्र जवळपास असेच आहे. प्रथम चरणात अनुमतीची मोहोर उमटलेल्या मान्यताप्राप्त ६४ 'सेझ'मधून आगामी दोन वर्षांच्या कालावधीत (म्हणजे २००९ सालापर्यंत) एकंदर ८ लाख ९० हजार श्रमिकांना रोजगार मिळू शकेल, असा या संदर्भातील अंदाज आहे. या ६४ 'सेझ'मध्ये सुमारे साडेतेरा अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक अपेक्षित आहे.

'सेझ'मुळे होणाऱ्या रोजगारनिर्मितीमध्येही पुन्हा 'प्रत्यक्ष' आणि 'अप्रत्यक्ष' असे दोन गट करावे लागतील. 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगव्यवसायांद्वारे निर्माण झालेल्या रोजगाराची गणना ही 'प्रत्यक्ष' रोजगारात होते. तर, 'सेझ'मधील उद्योगांचे अर्थव्यवस्थेत अन्यत्र ('सेझ'च्या भौगोलिक सीमांबाहेरील क्षेत्रात) सक्रिय असणाऱ्या उद्योग-उत्पादन-व्यापार घटकांशी जे औद्योगिक-व्यावसायिक-व्यावहारिक संबंध प्रस्थापित होतात (उदाहरणार्थ पूरक उद्योग) त्यांद्वारे 'सेझ'बाहेरील अशा उद्योगव्यवसायांत जी रोजगारनिर्मिती होते तिची गणना 'अप्रत्यक्ष' रोजगाराच्या गटात करावी लागते. म्हणजेच, 'सेझ'मुळे होणाऱ्या एकूण रोजगारनिर्मितीमध्ये अशा 'प्रत्यक्ष' व 'अप्रत्यक्ष' रोजगाराचा अंतर्भाव होतो. असा 'अप्रत्यक्ष' रोजगार किती मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल हे बऱ्याच अंशी 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगांची उत्पादने, त्यांनी अंगिकारलेले उत्पादन तंत्रज्ञान यांसारख्या बाबींवर अवलंबून राहते.

**(३) आंतरराष्ट्रीय व्यापाराची रंगीत तालीम :** जागतिक व्यापार संघटनेच्या कायदेकानूंची, त्यातील बदलांची, खाचाखोचांची प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे चांगली जानपहचान देशोदेशीच्या सरकारांना 'सेझ'च्या माध्यमातून होते, असाही अनुभव अलीकडील काळात येऊ लागला आहे. जागतिक व्यापार संघटनेने तयार केलेल्या कायदेकलमांच्या जंजाळातून कशा प्रकारे मार्ग काढावयाचा, 'सेझ'मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योगव्यवसायांना देऊ करण्यात आलेल्या सवलती-अनुदानांची सांगड जागतिक व्यापार संघटनेच्या करविषयक नियमांच्या चौकटीशी कशी घालावयाची, या चौकटीत वेळोवेळी होणाऱ्या बदलांची दखल घेत त्यानुसार 'सेझ'मधील उद्योगांसाठी मुक्त व्यवहारविषयक प्रणाली केव्हा व कोणती आखावयाची, त्यात कसे व कोणते परिवर्तन

घडवून आणावयाचे या संबंधीची तयारी करताना आपोआपच जागतिक व्यापार संघटनेशी व्यवहार करण्यानी जणू रंगीत तालीमच देशोदेशीच्या सरकारपदस्थ धुरिणांना मिळत जाते.

## (४) लाल फितीस लगाम :

'गुड गव्हर्नन्स' चाच हा एक पैलू. सरकारी दप्तरातील दिरंगाईचा फटका उद्योग व्यवसायांना बसतो, हा जगभरचाच अनुभव. या दप्तरदिरंगाईपायी एकीकडे प्रशासनात अनुचित प्रथापरंपरांचे पेव फुटते तर, दुसरीकडे आवश्यक त्या मंजुऱ्या-अनुमती वेळेवर न मिळाल्याने प्रकल्पांची प्रत्यक्ष कार्यवाही लांबते आणि त्याची परिणती प्रकल्पाच्या खर्चात वाढ होण्यात होते. त्यापायी एकूणच प्रकल्पाचे अर्थशास्त्र ढासळते. 'सेझ' मध्ये राबविण्यात येणाऱ्या 'एक खिडकी मंजुरी' उपक्रमांसारख्या सुविधांमुळे या दप्तरदिरंगाईस परिणामकारक आळा बसून त्याचे अनुकूल परिणाम प्रत्यक्ष व्यवहारांत आढळून येतात, असाच देशोदेशींचा अनुभव आहे. व्हिएतनामचे उदाहरण या संदर्भात अतिशय बोलके आहे. 'सेझ' प्रणित विकासाची कास धरल्यापासून व्हिएतनामने सरकारी प्रशासनातील दिरंगाईस पायबंद घालण्याचे कसून प्रयत्न केले. त्याची गोमटी फळेही कामकाजात दिसू लागली. नवीन प्रकल्पांना मंजुरी मिळण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सव्यापसव्यापायी जेथे पूर्वी तब्बल १८ महिने खर्ची पडावयाचे तेच काम अवघ्या ६० दिवसांत उरकले जाऊ लागले !

'सेझ' आणि आर्थिक विकास यांच्या अन्योन्य संबंधांबाबत कितीही मतमतांतरे असली तरी देशोदेशीच्या सरकारांना विकासाच्या 'सेझ' प्रणित 'मॉडेल' ची एवढी 'क्रेझ' का असावी, याची बरीचशी कल्पना या विवेचनावरून येते. त्याच वेळी खुद्द 'सेझ' मध्ये कार्यरत असणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी 'सेझ' च्या या संकल्पनेकडे कोणत्या भूमिकेतून बघतात, हीसुद्धा एक कुतूहलाचीच बाब ठरते. इथेही तैवानचाच दाखला मार्गदर्शक ठरतो. तैवानी 'सेझ' मध्ये कार्यरत असणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या लेखी या नोकऱ्या म्हणजे अमेरिका-युरोप-कॅनडामधील अधिक आकर्षक रोजगार संधींकडे झेप घेण्यास साहाय्यभूत ठरणारे जणू 'स्टेपिंग स्टोन' च. प्रगत देशांमधील श्रमांच्या बाजारपेठेच्या त्या जणू खिडक्याच ! आपापल्या देशातील 'सेझ' मध्ये काम करत करत आवश्यक तो अनुभव पदरी बांधायचा आणि योग्य संधी आली की करायचे उड्डाण. 'सेझ' च्या आकर्षणाची जी चतुःसूत्री येथवर चर्चिली तिचा हा पाचवा (छुपा) पैलूच जणू !

# ANNOUNCEMENT

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lump-sum on or before June 30, 2007.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | ***Five Year Subscription*** |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net — Phone - 25657132
Fax - 25657697 — - 25657210

# जातिसमूहांची राज्यनिहाय स्थिती

अनुसूचित जाती-जमाती तसेच अन्य मागासवर्गीय प्रवर्गातील कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण किती आहे, याचे निदान करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने (नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन - एनएसएसओ) २००३ साली भारताच्या प्रत्येक राज्यातील कुटुंबांचे नमुना पाहणी तत्वावर एक सर्वेक्षण केले. राज्यांच्या ग्रामीण तसेच शहरी भागांतील कुटुंबांचा या नमुना पाहणीत अंतर्भाव करण्यात आलेला होता. १९३१ सालच्या जनगणनेनंतर प्रथमच राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने हा उपक्रम हाती घेतला. या सर्वेक्षणाअंती हाती आलेली आकडेवारी मोठी उद्बोधक असून ती या लेखाच्या अखेरीस सादर केलेल्या तक्त्यात मांडलेली आहे (हा तक्ता लेखाच्या शेवटी पृष्ठ क्रमांक ३३ वर देण्यात आला आहे).

नमुना पाहणीत अंतर्भूत करण्यात आलेल्या कुटुंबांचे वर्गीकरण 'अनुसूचित जमाती', 'अनुसूचित जाती', 'अन्य मागासवर्गीय' आणि 'उर्वरित वा इतर प्रवर्ग' अशा चार गटांत करण्यात आले आहे. 'जात' हे वास्तव केवळ हिंदूधर्मीय कुटुंबांनाच लागू पडत असल्याने अन्य धर्मीय कुटुंबांची गणना 'उर्वरित' वा 'इतर ' या अखेरच्या गटात केली जावी, अशीच सर्वसाधारण अपेक्षा असावी हे स्वाभाविक आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र तसे घडलेले दिसत नाही. अनुसूचित जमाती या हिंदूधर्मांतर्गत जातिरचनेच्या चौकटीबाहेरच असल्याने त्यांच्यात जातिगट अथवा जातिसमूह आढळूनच येणार नाहीत. त्यांची गणना वेगवेगळ्या धर्मांत झालेली असणे हे संभवनीय आहे, ही पहिली बाब ध्यानात घेणे आवश्यक आहे. शीख अथवा बौद्धांसारख्या धार्मिक समूहांमध्येही ज्ञातपात पाळली जाते, ही दुसरी बाब आताशा सर्वज्ञात आहे. शिखांमध्येही अनुसूचित जाती आहेत. अनुसूचित जातींपैकी, बौद्धधर्माची दीक्षा घेतलेल्या नवबुद्धांची गणना १९५६ सालापासून 'बौद्ध' तसेच 'अनुसूचित जातीघटक' अशा दोन्ही प्रकारे महाराष्ट्रात केली जाते. हाच परिपाठ संपूर्ण देशभरात १९९१ सालच्या जनगणनेपासून सुरू झाला. इस्लाम अथवा ख्रिस्ती धर्मांसारख्या अन्य धर्मांतील व्यक्ती आपल्या जातीची ओळख सांगतात किंवा कसे हे मात्र स्पष्ट होत नाही. इस्लाम अथवा ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेण्यापूर्वी आमची गणना अमुकअमुक अनुसूचित जातीमध्ये केली जात असल्यामुळे

आता धर्मांतरानंतरही आमची गणना संदर्भित अनुसूचित जात अथवा अन्य मागासवर्गीय समूहांत केली जावी, अशी मागणी इस्लाम वा ख्रिस्ती धर्मांतील काही व्यक्ती करीत असल्याचे अधूनमधून कानावर येते. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने उपरोक्त चार गटांतील कुटुंबांचे वर्गीकरण त्यांच्या त्यांच्या धर्मानुसार सादर केले असते तर या मुद्याचा खुलासा होऊ शकला असता. सर्वेक्षणादरम्यान हा तपशील नोंदविला गेलेला असला तरी त्याबाबतची सांख्यिकी मात्र प्रकाशित करण्यात आलेली नाही. तेव्हा, नमुना पाहणीतील सगळ्याच इस्लामधर्मियांनी तसेच बहुतांश ख्रिस्तीधर्मियांनी आपापली जात नोंदविली असावी किंवा नसावी याचा अदमास घेण्यासाठी २००१ सालच्या जनगणनेनुसार मुस्लिम तसेच ख्रिस्ती धर्मियांचे देशाच्या एकूण लोकसंख्येत असलेले राज्यवार प्रमाण तक्त्याच्या सहाव्या स्तंभात नमूद केलेले आहे.

इस्लाम अथवा ख्रिस्ती या उभय धर्मापैकी एका धर्मातील, क्वचित प्रसंगी दोन्ही धर्मांतील काही कुटुंबांनी तरी निदान काही राज्यांत (बहुतेक बऱ्याच अथवा जवळपास सगळ्याच राज्यांत) त्यांची जात नोंदविली असावी, असे काही ठसठशीत उदाहरणांवरून स्पष्ट दिसते. उदाहरणार्थ, तामिळनाडूमध्ये 'इतर' या प्रवर्गातील कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण केवळ ४.४ टक्के इतकेच दिसते. अनुसूचित जमातींतील कुटुंबांसाठी हे प्रमाण एकूणांत केवळ एक टक्का इतकेच असल्याचे आढळते. परंतु, २००१ सालच्या जनगणनेनुसार, मुस्लिम आणि ख्रिस्ती लोकसंख्येचे एकूणांतील प्रमाण तामिळनाडूमध्ये जवळपास ११.७ टक्के इतके असल्याचे आकडेवारी सांगते. याचाच अर्थ हा की तामिळनाडूतील या दोन धर्मांमधील कुटुंबांनी त्यांची जातही नोंदविलेली आहे ! असेच अनुमान अन्य राज्यांच्याबाबतीत काढणे हे तितकेसे सोपे नाही. परंतु, जे चित्र तामिळनाडूमध्ये आढळून येते तेच चित्र थोड्याफार फरकाने अन्य राज्यांतही दिसणे शक्य आहे.

अनुसूचित जमातींची गणना ही जातिरचनेच्या चौकटीबाहेरच केली जात असल्याने एकूण कुटुंबांमधून अनुसूचित जमातींची कुटुंबे वगळूनच उर्वरित कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण 'अनुसूचित जाती', 'अन्य मागासवर्गीय' आणि 'इतर' अशा तीन गटांत सादर केले आहे. सर्वेक्षणातील नमुना कुटुंबांचे जातिसमूहनिहाय वर्गीकरण जातीरचनेत सर्वसाधारणपणे समाविष्ट केल्या जाणाऱ्या मुख्य जातसमूहांनुसार कळून यावे यासाठी (अनुसूचित जमातींची कुटुंबे एकूणांतून वगळून) तयार केलेली प्रमाणांची ही आकडेवारी कंसांत सादर केलेली आहे. राज्याराज्यांतील अन्य मागासवर्गीय कुटुंबांच्या एकूण

(बिगर अनुसूचित जमाती) कुटुंबांतील प्रमाणांच्या उतरत्या भाजणीनुसार देशभरातील राज्ये तक्त्यात मांडली आहेत. ही आकडेवारी मोठी मननीय आहे. संख्यात्मकदृष्ट्या 'अन्य मागासवर्गीय' हा देशातील सर्वांत मोठा जातसमूह ठरतो - या प्रवर्गातील नमुना कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण आहे ३९.४ टक्के इतके. 'इतर' प्रवर्गातील कुटुंबांचे प्रमाण त्या खालोखाल म्हणजे ३२.४ टक्के इतके दिसते तर, 'अनुसूचित जाती' आणि 'अनुसूचित जमाती' या दोन्ही जातसमूहांची एकत्रित टक्केवारी त्या नंतर म्हणजे २८.२ टक्क्यांवर येते. यात, अनुसूचित जमातींचा हिस्सा आहे ८.२ टक्के तर, अनुसूचित जातींचा हिस्सा आहे २०.० टक्के.

अनुसूचित जाती तसेच जमातींच्या घटकांना लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणानुसार सरकारी नोकऱ्या तसेच सरकारी शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण पुरविण्याची तरतूद भारतीय घटनेने केली आहे. या सूत्रानुसार या उभय जातिसमूहांचा शेर बनतो २८.२ टक्क्यांचा. अन्य मागासवर्गियांसाठी आरक्षणाची तरतूद मागाहून केली गेली. एकूण लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणाचा विचार केला तर सरकारी नोकऱ्यांमधील ३९.४ टक्के जागा या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखीव ठरतात. मात्र, आरक्षणाचे प्रमाण एकंदरीने ५० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये, असा महत्त्वपूर्ण निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निवाड्याचा विचार करता, अन्य मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींचा आरक्षणातील हिस्सा २१.८ टक्क्यांचा ठरतो ( ही टक्केवारी २००३ सालच्या नमुना पाहणीवर आधारलेली आहेत. आरक्षणाची टक्केवारी अगदी अलीकडच्या जनगणनेवर बेतलेली आहे. २००१ सालच्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची एकूणांतील टक्केवारी ८.२० इतकी तर, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येची एकूणांतील टक्केवारी १६.२० इतकी होती).

अन्य मागासवर्गीय कुटुंबांचे राज्यनिहाय वर्गीकरण पाहिले तर राज्याराज्यांत भरपूर फरक/तफावत आढळून येते. अन्य मागासवर्गीय प्रवर्गातील कुटुंबांचे एकूण कुटुंबांतील प्रमाण अभ्यासले तर तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही दोन राज्ये पार दोन ध्रुवांवर उभी ठाकलेली दिसतात. तामिळनाडूमध्ये अन्य मागासवर्गीय कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण ७२.८ टक्के इतके तर, 'इतर' प्रवर्गातील कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण ४.४ टक्के इतके असल्याचे आकडेवारी सांगते. पश्चिम बंगालसाठी मात्र हीच टक्केवारी अनुक्रमे ५.४ टक्के आणि ६०.९ टक्के अशी असल्याचे दिसते. पश्चिम बंगालमध्ये एकूणांतील तीन पंचमांशांपेक्षा अधिक कुटुंबे ही वरिष्ठ जातिसमूहांतील

(भद्र लोक ?) असल्याचे आढळते, तर अन्य मागासवर्गियांचे प्रमाण एकूणांत नगण्यच असल्याचे सांख्यिकी दाखवते. या उलट, तामिळनाडूमध्ये बहुसंख्य कुटुंबे ही अन्य मागासवर्गीय जातीसमूहांत मोडतात तर, वरिष्ठ जातींचे प्रमाण (मुख्यत्वेकरून ब्राह्मण ? ) हे संख्यात्मकदृष्ट्या अगदीच क्षुल्लक असल्याचे चित्र दिसते. अन्य मागासवर्गियांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रत या दोन राज्यांमध्ये उसळलेल्या प्रतिक्रियांमधील लक्षणीय फरकावर या ठिकाणी प्रकाश पडतो. 'इतर' प्रवर्गातील कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण तामिळनाडूमध्ये नगण्यच आहे. असे असतानाही, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध तिथे उठलेले काहूर हे अनाकलनीय ठरते. अन्य मागासवर्गीय कुटुंबांचे प्रमाण एकूणांत घसघशीत असतानाही, संख्यात्मकदृष्ट्या एकूण लोकसंख्येत मूठभर असणाऱ्या अन्य प्रवर्गांना नोकऱ्यांमध्ये खुल्या असणाऱ्या उर्वरित ५० टक्के जागांबाबत अन्य मागासवर्गियांचा एवढा विरोध का असावा ? कारण काहीही झाले तरी एकंदर लोकसंख्येत जेमतेम ४.४ टक्के प्रमाण असणारे प्रवर्ग खुल्या प्रवर्गासाठीच्या ५० टक्के जागा कधीच बळकावू शकणार नाहीत, हे तर अगदी साधे सरळ गणित आहे.

देशभरातील राज्यांचा विचार करता, १९ राज्यांपैकी नऊ राज्यांमध्ये अन्य मागासवर्गियांचे एकूणांतील प्रमाण हे राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे सांख्यिकी सांगते. तामिळनाडू, छत्तिसगड, बिहार, झारखंड, केरळ, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश ही ती नऊ राज्ये. तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश वगळता अन्य सात राज्यांची गणना हिंदी भाषक आर्यावर्ताच्या गाभ्यात केली जाते. अन्य १० राज्यांचा विचार केला तर, पश्चिम बंगालव्यतिरिक्त उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि आसामात अन्य मागासवर्गियांचे प्रमाण एकूणांत २० टक्क्यापेक्षा कमी असल्याचे आकडेवारी सांगते. 'अनुसूचित जाती' अथवा 'अन्य मागासवर्गीय' अशा प्रकारे विविध जातींचे वर्गीकरण करणे, अथवा अनुसूचित जमातींमध्ये अंतर्भाव होणाऱ्या विविध समूहघटकांचे निर्धारण करणे हे बव्हंशी सरकारच्या निर्णयावरच अवलंबून असते. अनुसूचित जमाती तसेच अनुसूचित जातींच्याबाबतीत हे निर्णय हे अंतिमत: केंद्र सरकारवरच निर्भर राहतात. एखाद्या जातिसमूहाचा निर्देश हा अनुसूचित जातीमध्ये करावयाचा की अनुसूचित जमातीमध्ये तिचा अंतर्भाव करावयाचा याबाबत राज्य सरकारे कोड्यात पडण्याचे प्रसंग काही वेळा उद्‌भवतात. केवळ इतकेच नाही तर, या संदर्भात केंद्र सरकारही धरसोडीचा पवित्रा धारण करताना कधीकधी दिसते.

परंतु, अन्य मागासवर्गीय जातींसंदर्भात मात्र निर्णयाचे सर्वाधिकार राज्यांकडे सोपविण्यात आलेले आहेत. काही समाजघटकांचे वर्गीकरण 'मागास जाती' म्हणून करण्यास राज्य सरकार राजी नसल्यामुळेच पश्चिम बंगालमध्ये अन्य मागासवर्गियांचे एकूणांतील प्रमाण अत्यल्प असल्याचे चित्र उभरते, ही बाब नोंदविण्यात आलेली आहे. अन्य राज्यांतही हेच घडताना दिसते. कर्नाटकाचेच उदाहरण पाहण्यासारखे आहे. कर्नाटकमध्ये वक्कलिग्गांचा अंतर्भाव अन्य मागासवर्गियांमध्ये करण्यात आलेला असला तरी लिंगायतांना मात्र त्यातून वगळण्यात आललें आहे. दोनएक राज्यांमध्ये जाटांचा समावेश अन्य मागासवर्गियांत करण्यात आला आहे. परंतु, अन्य राज्यांतही जाट आढळून येत असले तरी तिथे मात्र जाटांचा अंतर्भाव अन्य मागासवर्गियांत केला गेलेला नाही.

विविध जातीसमूहांमधील व्यक्तींचे शैक्षणिक पातळीनुसार तसेच जमीन धारणा व जमीन कसण्यासंदर्भातील विद्यमान स्थितीनुसार वर्गीकरण उपलब्ध होऊ शकले तर अन्य मागासवर्गियांमध्ये त्या त्या गटांचा अंतर्भाव केला जाण्यासंदर्भातील चित्राचा तौलनिक अभ्यास करणे शक्य होईल. उपरोक्त चार मुख्य जातिसमूहांतील व्यक्तींची शैक्षणिक पातळी तसेच जमीन धारणेसंदर्भातील सांख्यिकी, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेने २००४-०५ मध्ये केलेल्या देशभरातील रोजगारविषयक पाहणीदरम्यान संकलित करण्यात आली होती (एनएसओ - ६१ वी फेरी). परंतु, या आकडेवारीचे तक्ते अथवा कोष्टके मात्र तयार करण्यात आलेली नाहीत. ही सांख्यकी जर तक्त्यांच्या स्वरूपात हाती आली तर उपरोक्त चार जातिसमूहांच्या तौलनिक स्थितीवर - ग्रामीण तसेच शहरी भागांतील स्थितीवर - काही प्रकाश पडू शकेल. परंतु, ही अशीच तुलना जातनिहाय करणे मात्र शक्य होणार नाही.

अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातींव्यतिरिक्त अन्य मागासवर्गीय प्रवर्गातील बहुसंख्य -एकूणांतील ७५.९ टक्के - हे देशाच्या ग्रामीण भागातच राहतात,

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल. -संपादक

हे तक्त्यातील आकडेवारीवरून ध्यानात येते. मात्र, या संदर्भात सर्वच राज्यांमध्ये समान प्रवृत्ती दिसत नाही. उत्तराखंडात अन्य मागासवर्गीय कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण केवळ ८.३ टक्के इतकेच असले तरी, हा समूह प्रामुख्याने शहरी भागांतच एकवटलेला आहे. उत्तराखंडातील शहरांत राहणाऱ्या या प्रवर्गातील व्यक्तींचे प्रमाण 'इतर' प्रवर्गापेक्षा आणि राज्यातील एकूण कुटुंबांच्या (शहरांत वास करणाऱ्या) प्रमाणापेक्षा अधिक आहे.

पश्चिम बंगाल, पंजाब, केरळ, बिहार आणि तामिळनाडू या पाच राज्यांत अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण राज्याच्या एकूण लोकसंख्येतील नागरीकरणाच्या प्रमाणापेक्षा अधिक असल्याचे आकडेवारी दर्शविते. या पाचांपैकी पश्चिम बंगाल, केरळ आणि पंजाब या तीन राज्यांत अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण हे 'इतर' प्रवर्गातील नागरीकरणाच्या प्रमाणापेक्षा अंमळ कमी वा जवळपास तितकेच भरते. या उलट, झारखंड, ओरिसा, हरयाना, आसाम, महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरात या सात राज्यांमध्ये केवळ एकूण कुटुंबांच्या आणि 'इतर' प्रवर्गातील कुटुंबांच्याच तुलनेत नव्हे तर, अनुसूचित जातींच्या तुलनेतही नागरीकरणाचे प्रमाण अन्य मागासवर्गियांमध्ये कमी असल्याचे आढळून येते. या सातांपैकी पहिल्या तीन राज्यांत अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण हे अनुसूचित जातींमधील नागरीकरणापेक्षा किंचितच कमी दिसते. उर्वरित चार राज्यांमध्ये अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण हे अनुसूचित जातींमधील नागरीकरणापेक्षा लक्षणीयरीत्या कमी होते. विशेषत्वाने, गुजरात आणि कर्नाटक या दोन राज्यांत ही प्रवृत्ती ठळकपणे आढळून येते.

तुलना करण्यास अन्य कोणतेही निर्देशक उपलब्ध नसल्याने, अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण हे त्यांच्या तौलनिक स्थिती-स्थानाचे सूचक म्हणून स्वीकारता येईल. 'इतर' प्रवर्गातील जनसमूहांच्या (तसेच अनुसूचित जातिसमूहांमधीलही) नागरीकरणाच्या तुलनेत अन्य मागासवर्गियांमधील नागरीकरणाचे प्रमाण कमी असेल तर बहुधा ते समाजातील त्यांच्या सर्वसाधारणतः निम्न स्थानाचेच सूचन घडविते. अन्य मागासवर्गियांमधील काही जमीनधारक असतील वा ते जमीन कसतही असतील, परंतु, शैक्षणिक तसेच सामाजिक पत यांचा विचार केला तर त्यांचे स्थान हे 'इतर' प्रवर्गातील जनसमूहांपेक्षा कदाचित निम्न स्तरावरच असल्याचे चित्र दिसणे शक्य आहे.

## तक्ता - जातिसमूहांच्या लोकसंख्येची राज्यनिहाय स्थिती -२००३
(संदर्भ -राष्ट्रीय नमुना पाहणी अहवाल क्रमांक ५०३, ५९वी फेरी)

| राज्य आणि शहरी/ग्रामीण (१) | अनुसूचित जमाती (२) | अनुसूचित जाती (३) | अन्य मागास - वर्गीय (४) | इतर (५) | मुस्लिम व ख्रिश्चन यांची टक्केवारी (६) |
|---|---|---|---|---|---|
| (१)तामिळनाडू | | | | | |
| एकूण | १ | २१.८(२२.०) | ७२.८ (७३.५) | ४.४(४.५) | ११.७ |
| शहरी | १ | १३.४(१३.५) | ७६.२ (७७.०) | ९.४ (९.५) | |
| ग्रामीण | १ | २६.०(२६.३) | ७१.० (७१.७) | २.० (२.०) | |
| •नागरी कुटुंबांचे एकूणांत प्रमाण | ३२.७ | २०.३ | ३४.७ | ७०.४ | ३३.१* |
| (२)छत्तीसगढ | | | | | |
| एकूण | ३४.९ | १४.१ (२१.७) | ३९.१ (६०.१) | ११.९(१८.३) | ६.७ |
| शहरी | २०.८ | १३.५(१७.०) | २९.५(३४.२) | ३६.२ (४५.७) | |
| ग्रामीण | ३७.४ | १४.२ (२२.७) | ४०.९ (६५.३) | ७.५(१२.०) | |
| •नागरी प्रमाण | ९.३ | १४.८ | ११.७ | ४७.० | १५.५* |
| (३)बिहार | | | | | |
| एकूण | १.१ | २१.४(२१.६) | ५७.८ (५८.४) | १९.७(१९.९) | १६.६ |
| शहरी | ०.६ | ९.२ (९.२) | ६०.४ (६०.८) | २९.८(३०.०) | |
| ग्रामीण | १.१ | २२.९(२३.२) | ५७.५ (५८.१) | १८.५(१८.७) | |
| •नागरी प्रमाण | ६.७ | ४.७ | ११.५ | १६.६ | ११.०* |
| (४)झारखंड | | | | | |
| एकूण | ३१.७ | १३.३(१९.५) | ३८.७ (५६.६) | १६.३(२३.९) | १७.८ |
| शहरी | १७.५ | ११.०(१३.३) | ३०.८(३७.३) | ४०.७(४९.४) | |
| ग्रामीण | ३५.४ | १३.९(२१.५) | ४०.७ (६३.०) | १०.० (१५.५) | |
| •नागरी प्रमाण | ११.२ | १६.९ | १६.२ | ५१.० | २०.४* |
| (५)केरळ | | | | | |
| एकूण | १ | ११.०(११.१) | ५२.५ (५३.०) | ३५.४(३५.८) | ४३.७ |
| शहरी | ०.५ | ६.९ (६.९) | ५४.६ (५४.९) | ३८.०(३८.२) | |
| ग्रामीण | १.२ | १२.५(१२.७) | ५१.८ (५२.४) | ३४.५ (३४.९) | |
| •नागरी प्रमाण | १३.८ | १६.२ | २६.९ | २७.८ | २५.९* |

| राज्य आणि शहरी/ग्रामीण (१) | अनुसूचित जमाती (२) | अनुसूचित जाती (३) | अन्य मागास वर्गीय (४) | इतर (५) | मुस्लिम व ख्रिश्चन यांची टक्केवारी (६) |
|---|---|---|---|---|---|
| (६)उत्तरप्रदेश | | | | | |
| एकूण | ०.८ | २५.२ (२५.४) | ४९.७ (५०.१) | २४.३(२४.५) | १८.६ |
| शहरी | ०.६ | १५.८(१६.०) | ४२.९ (४३.२) | ४०.४(४०.८) | |
| ग्रामीण | ०.९ | २७.८(२८.१) | ५१.६ (५२.१) | १९.६ (१९.८) | |
| •नागरी कुटुंबांचे एकूणांत प्रमाण | १६.६ | १३.९ | १९.१ | ३७ | २२.१* |
| (७)राजस्थान | | | | | |
| एकूण | १४.६ | १८.२ (२१.३) | ४२.५ (४९.८) | २४.७(२४.२) | ८.६ |
| शहरी | ३.३ | १३.२ (१३.६) | ३७.२ (३८.४) | ४६.५(५३.८) | |
| ग्रामीण | १८.१ | १९.८ (२३.२) | ४४.१ (४८.०) | १८.०(२२.०) | |
| •नागरी प्रमाण | ५.४ | १७.२ | २०.८ | ४४.७ | २३.८* |
| (८)मध्यप्रदेश | | | | | |
| एकूण | १६.२ | १७.६(२१.०) | ४१.३ (४९.२) | २५.०(२९.८) | ६.७ |
| शहरी | ५.१ | १४.४(१५.२) | ३८.६ (४०.६) | ४१.९(४४.२) | |
| ग्रामीण | १९.७ | १८.६(२३.२) | ४२.१ (५२.४) | १९.६(२४.४) | |
| •नागरी प्रमाण | ७.७ | १९.८ | २२.७ | ४०.७ | २४.३* |
| (९)आंध्रप्रदेश | | | | | |
| एकूण | ६.४ | २१.४(२२.९) | ४५.८ (४८.९) | २६.४(२८.२) | १०.८ |
| शहरी | २.५ | ११.१(११.९) | ४४.३ (४५.४) | ४२.२ (४३.३) | |
| ग्रामीण | ७.८ | २५.०(२७.१) | ४६.४ (५०.३) | २०.८(२२.६) | |
| •नागरी प्रमाण | १०.२ | १३.६ | २५.४ | ४१.९ | २६.२* |
| (१०)ओरिसा | | | | | |
| एकूण | २४.८ | १९.८(२६.३) | ३६.३ (४८.३) | १९.०(२५.३) | ४.५ |
| शहरी | ८.८ | १५.८(१७.३) | २८.१ (३०.८) | ४७.३(५१.९) | |
| ग्रामीण | २७.४ | २०.५(२८.२) | ३७.६ (५१.८) | १४.५(२०.०) | |
| •नागरी प्रमाण | ४.८ | १०.८ | १०.६ | ३३.९ | १३.६* |

(*) नागरी कुटुंबांची एकूण कुटुंबांशी टक्केवारी, <u>टीप</u> कंसातील आकडेवारी संदर्भित कुटुंबांची एकूण कुटुंबांतील टक्केवारी. मात्र एकूण कुटुंबांत अनुसूचित जमातींचा समावेश नाही.

| राज्य आणि शहरी/ग्रामीण (१) | अनुसूचित जमाती (२) | अनुसूचित जाती (३) | अन्य मागास - वर्गीय (४) | इतर (५) | मुस्लिम व ख्रिश्चन यांची टक्केवारी (६) |
|---|---|---|---|---|---|
| (११)गुजरात | | | | | |
| एकूण | १५.२ | ११.३(१३.३) | ३६.३ (४२.८) | ३७.२ (४३.९) | ९.७ |
| शहरी | ४.८ | १२.६(१३.२) | ३०.० (३१.५) | ५२.६ (५५.३) | |
| ग्रामीण | २१.१ | १०.५(१३.३) | ३९.९ (५०.६) | २८.५ (३६.१) | |
| •नागरी कुटुंबांचे एकूणांत प्रमाण | ११.५ | ४०.३ | २९.८ | ५१.१ | ३६.१* |
| (१२)कर्नाटक | | | | | |
| एकूण | ५.५ | १७.७(१८.७) | ३२.८ (३४.७) | ४४.०(४६.६) | १४.१ |
| शहरी | २.२ | ११.७(१२.०) | २८.६(२९.३) | ५७.४(५८.७) | |
| ग्रामीण | ७.२ | २०.६ (२२.२) | ३९.९ (३७.६) | ३७.३(४०.२) | |
| •नागरी प्रमाण | ११.५ | ४०.३ | २९.८ | ५१.१ | ३६.१* |
| (१३)हरयाना | | | | | |
| एकूण | ०.७ | २३.७(२३.९) | ३३.४(३३.६) | ४२.४(४२.५) | ५.९ |
| शहरी | ०.२ | १८.८(१८.८) | २५.४ (२५.५) | ५५.६ (५५.७) | |
| ग्रामीण | ०.९ | २५.७(२५.९) | ३६.४ (३६.७) | ३७.० (३७.४) | |
| •नागरी प्रमाण | ८.२ | २२.० | २१.२ | ३६.७ | २७.८* |
| (१४)महाराष्ट्र | | | | | |
| एकूण | ९.४ | १३.६(१५.०) | २७.८ (३०.८) | ४९.१ (५४.२) | ११.७ |
| शहरी | २.८ | १२.२ (१२.६) | २०.१ (२०.७) | ६४.९ (६६.८) | |
| ग्रामीण | १४.५ | १४.६(१७.१) | ३३.७ (३९.४) | ३७.२ (४३.५) | |
| •नागरी प्रमाण | १२.६ | ३८.७ | ३१.१ | ६६.७ | ४३.०* |
| (१५)आसाम | | | | | |
| एकूण | १० | ११.०(१२.२) | २३.४ (२६.०) | ५५.६(६१.६) | ११.७ |
| शहरी | ५ | १३.०(१३.७) | १२.९ (१३.६) | ६९.१ (७२.७) | |
| ग्रामीण | १०.६ | १०.८(१२.१) | २४.७ (२७.६) | ५३.९ (६०.३) | |
| •नागरी प्रमाण | ५.६ | १३.१ | ६.१ | १३.८ | ११.१* |

**टीप - स्तंभ ६ मधील टक्केवारी मुस्लिम व ख्रिश्चनांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण दर्शविते. ही लोकसंख्या २००१सालच्या जनगणनेची आहे.**

| राज्य आणि शहरी/ग्रामीण (१) | अनुसूचित जमाती (२) | अनुसूचित जाती (३) | अन्य मागास - वर्गीय (४) | इतर (५) | मुस्लिम व ख्रिश्चन यांची टक्केवारी (६) |
|---|---|---|---|---|---|
| (१६)हिमाचल | | | | | |
| एकूण | ७.७ | २२.५(२४.२) | १७.८ (१९.२) | ५२.६(५६.६) | २.१ |
| शहरी | ३.२ | १७.५(१८.२) | १५.९ (१६.४) | ६३.३ (६५.४) | |
| ग्रामीण | ७.५ | २३.२ (२५.१) | १८.१ (१९.६) | ५१.२ (५५.३) | |
| •नागरी कुटुंबांचे एकूणांत प्रमाण | ५.३ | ८.८ | १०.१ | १९.७ | ११.४* |
| (१७)पंजाब | | | | | |
| एकूण | ०.५ | ३६.१ (३६.३) | १५.७ (१५.८) | ४७.७(४७.९) | २.८ |
| शहरी | ०.७ | २५.५(२५.७) | १७.३(१४.७) | ५६.५ (५६.९) | |
| ग्रामीण | ०.४ | ४१.९ (४२.१) | १४.८ (१४.९) | ४२.९(४३.०) | |
| •नागरी प्रमाण | ५० | २५ | ३८.९ | ४१.९ | ३५.४* |
| (१८)उत्तराखंड | | | | | |
| एकूण | २.४ | २४.४(२५.०) | ८.३ (८.५) | ६४.९(६६.५) | १२.२ |
| शहरी | १.४ | १९.९(२०.२) | १४.४ (१४.६) | ६४.३ (६५.२) | |
| ग्रामीण | २.७ | २५.५(२६.२) | ६.८ (७.०) | ६५.०(६६.८) | |
| •नागरी प्रमाण | १२ | १६.७ | ३५.५ | २०.३ | २०.५* |
| (१९)प. बंगाल | | | | | |
| एकूण | ४.८ | २८.९(३०.३) | ५.४ (५.७) | ६०.९(६४.०) | २५.८ |
| शहरी | ०.८ | २२.६(२२.८) | ६.२ (६.२) | ७०.४ (७१.०) | |
| ग्रामीण | ६.१ | ३१.१ (३३.१) | ५.२ (५.५) | ५७.६ (६१.४) | |
| •नागरी प्रमाण | ४.१ | १९.९ | २८.९ | २९.४ | २५.४* |
| (२०)भारत | | | | | |
| एकूण | ८.२ | २०.०(२१.८) | ३९.४ (४२.९) | ३२.४(३५.३) | १५.७ |
| शहरी | ३ | १४.६(१५.०) | ३४.७ (३५.८) | ४७.७ (४९.२) | |
| ग्रामीण | १०.२ | २२.०(२४.५) | ४१.१ (४५.८) | २६.७ (२९.७) | |
| •नागरी प्रमाण | ९.९ | १९.९ | २४.१ | ४०.२ | २७.३* |

# 'थिंक ग्लोबल अॅक्ट लोकल'

जगाची वाटचाल एका 'खेड्या'कडे होत असण्याच्या या काळात ब्रिटनमधील एक 'खेडे' खरोखरच 'ग्लोबल' होऊ लागले आहे. ब्रिटनमधील अनेक गावांसह अन्य देशांतील नागरिकही या खेड्याची चौकशी करू लागले आहेत. तेथे भेट देण्याचा आपला मानस बोलून दाखवू लागले आहेत. ब्रिटनच्या वायव्य प्रांतातील चेशायर डोंगरांच्या कुशीतील हे खेडे - अॅश्टन हेज. वातावरणातील कार्बन वायूच्या वाढत्या प्रमाणामुळे 'ग्लोबल वॉर्मिंग' वाढत असल्याने या खेड्याने 'कार्बन न्यूट्रल' बनण्याचा ध्यास घेतला आहे. म्हणजे काय, तर, आपल्या गावातील ज्या ज्या व्यवहारांमुळे/कामांमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते ते कमी कमी करत न्यायचे. हे कसे करायचे ? याचे उत्तर अगदी सोपे आहे. दैनंदिन जीवनातील आपल्या ज्या कृतींमुळे वातावरणातील कार्बन वायूचे प्रमाण वाढते वा अन्य मार्गाने पर्यावरणाची हानी होते, त्या कृती टाळायच्या व त्याऐवजी इतर उपलब्ध पर्यायांचा अवलंब करायचा. पण याचा अर्थ सध्याची 'लाइफस्टाइल' आमूलाग्र बदला असा नाही. कारण, लगोलग तसे करणे आता व्यवहार्य नाही. दुसऱ्या परिभाषेत 'इको-इनिशिएटिव्हज्'ची ही सुरुवात म्हणता येईल. असा पुढाकार घेणाऱ्या सजग नागरिकांच्या कृतिशीलतेची काही उदाहरणे अशी -

● अत्यावश्यक तेथेच ऊर्जा वापरणे. ऊर्जा वाचवणे हा ऊर्जानिर्मितीचा एक मार्ग मानणे. शक्य तेथे सौरऊर्जेचा उपयोग करणे. प्राथमिक शाळेतील स्वच्छतेसाठी सौरऊर्जेच्या वापराद्वारे गरम करण्यात आलेले पाणीच वापरायचे असे ठरवून तशी कृती करण्यात आली.

● ख्रिसमसच्या दिवशी परस्परांचे शुभचिंतन करताना हजारो शुभेच्छापत्रांची देवाण-घेवाण केली जाते. त्यासाठी लागणारा कागद व त्यापायी होणारी वृक्षतोड तसेच घराघरांतील 'ख्रिसमस ट्री'च्या सजावटीसाठी लागणारे दिवे - म्हणजे ऊर्जा या बाबी लक्षात घेऊन अॅश्टनच्या नागरिकांनी मिळून एकच 'ख्रिसमस ट्री' सजवला व त्यावर एकच शुभेच्छापत्र अडकवून सर्वांनी परस्परांना शुभेच्छा दिल्या.

● परंपरागत ओव्हनसाठी जास्त ऊर्जा खर्च होते हे लक्षात आल्यानंतर तेथे ऊर्जा कमी प्रमाणात लागणारा मिनी कुकर वापरण्याचे ठरविण्यात आले.

● वाहनांची संख्या वाढवून वाहनप्रदूषणात भर घालण्यापेक्षा चार-पाच व्यक्तींनी मिळून एक मोटार 'शेअर' करायची, असाही प्रयोग करण्यात येत आहे. तसेच जिथे १०-१५ नागरिकांना एकत्र मिळून जायचे असेल तिथे खाजगी गाड्या न वापरता मिनिबस वापरण्यात येऊ लागली.

● 'कार्बन न्यूट्रल प्रोजेक्ट'च्या यशस्वितेबाबत साशंक असणाऱ्या एका उपाहारगृहाच्या मालकाने ऊर्जा वाचविण्यासाठी केवळ प्रयोगाखातर बीअरच्या शीतपेट्या रात्री बंद ठेवून बघितल्या. त्याच्या असे लक्षात आले की यामुळे बीअर तर खराब झाली नाहीच, उलट विजेवरील खर्चात मात्र एक तृतीयांशाने घट झाली. अशा प्रकारे स्वानुभवातून नागरिकांचा सहभाग वाढत गेला.

● विजेवर चालणारी उपकरणे काम पूर्ण झाल्यानंतर लगेचच बंद करायची. यामुळे प्रत्येक घरामागे १० ते १५ टक्के विजेची बचत होऊन विजेचे बीलही कमी आले.

● विमानप्रवासामुळे होणारे प्रदूषण लक्षात घेता दूरवरचे प्रवास टाळायचे व शक्यतो व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधायचा.

● घरी बसून कार्यालयीन कामकाज करणे शक्य व्हावे यादृष्टीने सर्वांना मोफत ब्रॉडबँड कनेक्शन मिळावे यासाठी योजना आखण्यात येत आहे.

'कार्बन न्यूट्रल' असण्याचा प्रयत्न करताना या खेड्याने काही शास्त्रशुद्ध अभ्यासही केला. उदाहरणार्थ, विद्यापीठात पर्यावरणशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रत्येक घराचा, कुटुंबाचा अभ्यास (सर्वेक्षण) करवून घेण्यात आला. त्याद्वारे एका खेड्यामुळे - ऑस्टनमुळे - वातावरणातील कार्बनचे प्रमाण किती वाढते (कार्बन फूटप्रिंट), याचा साधारण अंदाज घेण्यात आला. तेव्हा असे लक्षात आले की, आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या या खेड्याचा कार्बन फूटप्रिंट प्रतिवर्षी ४७६६ टन एवढा आहे. एका कुटुंबासाठी हे प्रमाण प्रतिवर्षी १२ ते १३ टन एवढे असून ते राष्ट्रीय सरासरीपेक्षा (१० टन) जास्त आहे. येथील नागरिक घरापासून कार्यालयापर्यंत जाण्यासाठी तसेच कार्यालयीन कामांसाठी १ लाख ७५ हजार मैलांचा प्रवास दरवर्षी करतात (म्हणजे वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणात भर पाडण्यात मदत करतात).

ऑस्टनची अशी वाटचाल झाली ती गॅरी शार्नॉक यांच्या पुढाकाराने. ते स्वतः आहेत जलतज्ज्ञ. अनेक वर्षे त्यांनी विज्ञानविषयक पत्रकार म्हणून काम केले. अलीकडे

त्यांनी तंत्रज्ञानविषयक सल्ला देणारी कंपनी स्थापन केली आहे. शार्नॉक यांना प्रेरणा मिळाली ती ब्रिटनमधील प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर डेव्हिड किंग यांच्या एका भाषणातील एका वाक्याने. 'ग्लोबल वॉर्मिंग'चा प्रश्न गंभीर असला तरी त्याबाबत प्रत्येकाला काही कृती करणे शक्य आहे. तसेच यासाठी सरकारवरच पूर्णपणे अवलंबून राहण्याची गरज नाही, असे किंग यांनी म्हटले होते. यानंतर शार्नॉक यांच्या असेही लक्षात आले की टोयोटा, एचएसबीसी यांसारख्या काही कंपन्या या संदर्भात कृती करू शकतात, तर आपण - सामान्य नागरिकांनीदेखील - असा प्रयत्न का करू नये ? मग शार्नॉक यांनी ब्रिटनच्या लोकशाहीतील सर्वत लहान प्रशासकीय घटक असलेल्या पारिश मंडळासमोर हा विषय मांडला. त्या मंडळाला ही कल्पना रुचली आणि त्यांनी शार्नॉक यांना पाठिंबा दिला, पण काही अटींवर. या संदर्भात राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी पारिश मंडळ काही खर्च करणार नाही आणि योजना आखणे, नागरिकांना एकत्र आणणे व निधी गोळा करणे इत्यादींसाठी शार्नॉक यांनाच वेळ द्यावा लागेल, या त्या अटी. मग पारिश मंडळाच्या एका रिक्त जागेवर शार्नॉक यांची निवडही करण्यात आली. शार्नॉक यांच्या प्रयत्नांनी अनेक नागरिक 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या प्रश्नाबाबत सतर्क झाले आणि गेल्या २५ वर्षांत खेड्यातील सभेला तुरळक असलेली हजेरी ४० वरून ४०० वर पोचली, तीही गेल्या वर्षीच्या कडाक्याच्या थंडीत ! त्या बैठकीत शार्नॉक यांनी हा विषय ग्रामस्थांमध्ये पुढे मांडला आणि आज हे संपूर्ण खेडेच त्यांच्या मागे उभे राहिले आहे. दैनंदिन व्यवहारात पर्यावरणाशी मैत्री करताना 'पर्यावरणवादी विरुद्ध चंगळवादी' असे स्वरूप या उपक्रमांना येणार नाही, याची काळजी मात्र त्यांनी घेतली. तसेच 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीनुसार ते वागले. त्यांनी स्वतःच्या जीवनशैलीत बदल करून आपलेच उदाहरण लोकांपुढे ठेवले. त्यामुळे त्यांच्या उद्दिष्टाचा प्रामाणिकपणा सर्वांच्या मनावर ठसला. अशा प्रकारच्या योजना राबवून नेमका किती व कसा फायदा होतो हे समजून येण्यासाठी काही काळ जावा लागेल. त्याचा पुन्हा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा लागेल. शार्नॉक यांच्या मते, आपण काहीतरी सत्कृत्य केल्याचे समाधान तरी येथील नागरिकांना मिळते आहे, एवढेच सध्या म्हणता येईल.

'ग्लोबल वॉर्मिंग' कमी होईल न होईल, पण असा प्रयत्न करणाऱ्या ॲश्टन हेजचा 'खारीचा वाटा' मात्र 'ग्लोबल वॉर्मिंग'विरुद्धच्या इतिहासात नक्कीच नोंदला जाईल. म्हणून तर, 'थिंक ग्लोबल ॲक्ट लोकल' या म्हणीची प्रचीती देणाऱ्या या खेड्याकडे अनेक पावले वळू लागली आहेत. ✿✿

# काम कमी, दाम कमी, पर्यावरणाचे नुकसान कमी !

'आजची आधुनिक जीवनशैली' हा पर्यावरणविषयक विविध चर्चांचा आज एक अविभाज्य घटक बनला आहे. 'अधिक काम, अधिक मोबदला' हे गणित आता सर्वांच्याच इतके अंगवळणी पडले आहे की, काम नसले तर काय करायचे, असा प्रश्न अनेकांना पडतो. दुसरीकडे, अधिक काम केल्याने मिळालेला पैसा खर्च तरी कुठे करायचा, असाही प्रश्न पडतो. मग मॉल, मल्टिप्लेक्स, मॅकडॉनल्डकडे पाय वळतात. चंगळवाद वाढीस लागतो. चंगळवादाची सवय लागली की पुन्हा माणसे 'अधिक काम व अधिक मोबदला' हे गणित जुळवू पाहतात. हे एक (दुष्ट ?)चक्रच असते. ते थांबवता येणे अवघड होऊन बसते.

आधुनिक जीवनशैली बदलता येणे शक्य आहे किंवा नाही हा वादाचा मुद्दा असला तरी ती बदलण्याच्या दिशेने काही ठिकाणी प्रयत्न होत आहेत. या बदलासाठी नवनवीन कल्पना पुढे येत आहेत. अशीच एक कल्पना पुढे आली आहे ती म्हणजे माणसाने मुळात कामाचे तासच कमी करण्याची ! यामुळे काय साध्य होईल ? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कामाला मिळणाऱ्या मोबदल्यात घट होईल. साहजिकच खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल. पर्यायाने चंगळवादी जीवनशैलीला थोडा आळा बसण्याची शक्यता निर्माण होईल. तसेच कामाचे तास कमी झाल्यास माणसे घरात, कुटुंबियांबरोबर अधिक वेळ घालवू शकतील. कौटुंबिक सुसंवाद वाढेल. दुसरीकडे, कामाचे तास कमी झाल्याने विविध क्षेत्रांत वापरण्यात येणाऱ्या ऊर्जेत बचत होईल. तसेच, औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनप्रक्रियेमुळे निर्माण होणाऱ्या व अशा विविध उत्पादनांच्या वापरामुळे वातावरणात प्रवेश करणाऱ्या कार्बन वायूचे प्रमाण घटेल. कार्यालयीन कामकाजाच्या वेळा सांभाळताना घराघरांत यंत्रांचा वापर अधिक प्रमाणात होऊ लागतो. अशा यंत्रांचे उत्पादन वाढते. या दोन्हींमुळे पुन्हा अधिक ऊर्जा खर्च होते. मग संपूर्ण जीवनशैली ऊर्जाकेंद्री बनत जाते. कामाचे तास कमी झाल्याने ती बदलण्याची अपेक्षा तरी करता येईल. विकसित देशांमधील नागरिकांची जीवनशैली चंगळवादी आहे, असे नेहमी म्हटले जाते. त्यामुळे, विकसित देशांमध्ये प्रथम असे प्रयोग करून बघितले पाहिजेत. पण, आज ना उद्या विकसनशील देशांमध्येही ते करून पाहावे लागतील. कारण, सर्वांच्या सहकार्यानेच 'ग्लोबल वॉर्मिंग' कमी होऊ शकेल, हे ध्यानात घेतले पाहिजे.

## प्रमुख संदर्भ

(1) The Economist February 3-9, 2007 (2) China : The Next Science Superpower - James Wilson and James Keeley, www.demos.co.uk (3) Ecologist, (4)www.ft.com/cms/s(5)www.ekklesia.co.uk/node(6) www.chineseculture.about.com (6) The Climate of Man - 1: Disappearing islands, thawing permafrost, melting polar ice. How the earth is changing; by, Elizabeth Kolbert, The New Yorker, 25 April 2005 (7) Far Eastern Economic Review, vol 170, no. 2, March 2007 (8) National Sample Survey Organisation Report No.503, 59 th Round)

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० / - रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका** - (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हींची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

**Indian States at a Glance 2006-07; MAHARASHTRA - Performance, Facts and Figures; Editors - Laveesh Bhandari and Sumita Kale; Publishers - Darling Kindersley (India) Pvt. Ltd; 2007; pp. 150; Price : Rs. 150/**

भारतातल्या प्रत्येक राज्याची व्यापक आणि प्रमाणभूत माहिती असणाऱ्या वाङ्मयाची उणीव नेहमीच भासते. 'मानव विकास अहवाला'सारखे काही दस्तऐवज चांगले असूनही ते सर्वच राज्यांसाठी उपलब्ध नाहीत. एखाद्या विशिष्ट क्षेत्राची इत्थंभूत माहिती देणारी किंवा तांत्रिक बाबींची चांगली जाण असणाऱ्या वाचकांची बौद्धिक भूक भागवू शकतील, अशीही काही माहितीपर प्रकाशने आहेत. पण त्यांच्यामुळे सामान्य वाचकाची व्यापक माहितीची भूक अतृप्तच राहते. 'पंजाब-हरयाना-दिल्ली चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'ने (PHDCCI) २१ मोठी राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि लहान राज्ये यांची विस्तृत माहिती देणाऱ्या पुस्तिकांची एक मालिकाच प्रकाशित केली आहे. सामान्य वाचकाला या मालिकेमुळे बरीच माहिती मिळू शकेल. प्रस्तुत पुस्तिका महाराष्ट्र राज्याच्या संदर्भातील आहे. पाच प्रकरणांच्या या पुस्तिकेतील पहिले प्रकरण संपूर्ण भारताचे विस्तृत चित्र रेखाटणारे आहे. दुसऱ्या प्रकरणात महाराष्ट्राच्या परिस्थितीचा गोषवारा आहे. तिसऱ्या प्रकरणात महाराष्ट्राचे संपूर्ण आर्थिक चित्र रेखाटले आहे. ७४ कोष्टकांमध्ये महाराष्ट्राबरोबरच गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या चार शेजारी राज्यांची आणि संपूर्ण देशाचीही आकडेवारी दिलेली आहे. वेगवेगळ्या राज्यांचा तौलनिक अभ्यास करणाऱ्यांना ती खूप उपयुक्त वाटेल. चौथ्या प्रकरणातील ४५ कोष्टके महाराष्ट्राचा संपूर्ण सामाजिक चेहरामोहरा उलगडून दाखविणारी आहेत. इथेही शेजारी राज्यांची आकडेवारी आहेच. शेवटच्या प्रकरणात ३० कोष्टकांच्या आधारे महाराष्ट्रातल्या ३५ जिल्ह्यांची समग्र आकडेवारी सादर केली आहे : लोकसंख्या, त्यातली वाढ व अनुसूचित जाती-जमातींचे प्रमाण, कुटुंबनियोजनाच्या बाबतीतली जागरूकता, साक्षरता, रोजगार, बँका, दुचाकी व चार चाकी वाहने, वीज, दूरचित्रवाणी व दूरध्वनीसेवेचा वापर इत्यादी विविध बाबी यात आहेत. विविधांगी अशी रोचक माहिती या पुस्तिकांमधून उपलब्ध करून देऊन PHDCCIने एक चांगले काम केले आहे, असे म्हणायला हरकत नाही. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •सुहास पळशीकर
•रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**